आतील पानात...
३ एनएचएआयच्या आदेशाला वाटाण्याच्या अक्षदा,
४ १४ वर्षीय मुलीवर अत्याचार करुन जीवे मारण्याची धमकी
५ सहकार मंत्र्यांचे आदेश 'लज्जास्पद';

पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
# जनप्रवास
मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.
RNI NO. MAHMAR/2013/57952



पान ८ वर..

शनिवार, दि. १३ जून २०२६ | वर्ष : १४ | अंक : ०५० | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

## राज्यातील सर्व ग्रामीण पाणीपुरवठा योजना सौर ऊर्जेवर आणणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### वीज थकबाकीमुळे योजना बंद पडू नयेत; सर्वंकष धोरण तयार करण्याच्या सूचना

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांवरील वाढती वीज देयकांची थकबाकी लक्षात घेता सर्व ग्रामीण पाणीपुरवठा योजना टप्प्याटप्प्याने सौर ऊर्जेवर आणाव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थानी आयोजित ग्रामीण पेयजल धोरण बैठकीत त्यांनी संबंधित विभागाला यासाठी सर्वंकष धोरण तयार करण्याच्या सूचना केल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पाणीपुरवठा योजनेचा स्रोत, लाभार्थी नागरिकांची संख्या, मोटार पंपाची क्षमता आणि आवश्यक वीज वापर लक्षात घेऊन महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून सौर ऊर्जेचे धोरण तयार करण्यात यावे. वीज बिलांच्या थकबाकीमुळे राज्यातील एकही पाणीपुरवठा योजना बंद पडू नये, याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**तालुका स्तरावर देखभाल-दुरुस्ती युनिट स्थापन होणार**

ग्रामीण आणि प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या



देखभाल-दुरुस्तीसाठी तालुका स्तरावर स्वतंत्र युनिट स्थापन करण्याची सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केली. या युनिटमध्ये ग्रामपंचायतींचा सहभाग राहणार असून पाणीपट्टीच्या वसुलीतून देखभाल खर्च भागविण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी वसुली कमी असेल, तेथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निधीतून मदत देण्यात येईल.

**शाश्वत जलस्रोतांवर भर**

ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांचे स्रोत शाश्वत असावेत, यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी भर दिला. वारंवार नवीन जलस्रोत शोधण्याऐवजी विद्यमान स्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी व्हीबी जी रामजी' योजनेअंतर्गत उपलब्ध निधीचा वापर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**अपूर्ण योजनांना निधी; जल जीवन मिशन योजनांची पडताळणी**

५० टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झालेल्या पुनर्जोडणी योजनांना प्राधान्याने निधी देऊन त्या पूर्ण कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. तसेच जल जीवन मिशनअंतर्गत १०० टक्के पूर्ण झालेल्या योजनांची पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

**२२ हजारांहून अधिक योजनांमध्ये सौर यंत्रणा प्रस्तावित**

बैठकीत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन यांनी सादरीकरण केले. जल जीवन मिशनअंतर्गत ११ हजार ६४३ योजनांमध्ये आधीच सौर यंत्रणेचा समावेश करण्यात आला असून राज्यातील एकूण २२ हजार १८५ पाणीपुरवठा योजनांसाठी सौर यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## पुण्यात ५० लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट; महापालिकेची विशेष मोहीम

### पावसाळ्यात शहरभर वृक्षलागवड; १५ क्षेत्रीय कार्यालयांसाठी दीड कोटींची तरतूद

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : यंदाच्या पावसाळ्यात शहरात ५० लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पुणे महापालिका विशेष मोहीम राबविणार आहे. या मोहिमेसाठी १५ क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्येकी १० लाख रुपये उपलब्ध करून देण्यात येणार असून, एकूण दीड कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी ही माहिती दिली.

महापालिकेच्या चालू अंदाजपत्रकात ५० लाख झाडे लावण्याची महत्त्वाकांक्षी घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरभर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली जाणार आहे. या मोहिमेत देशी वृक्षप्रजातींना प्राधान्य दिले जाणार असून टेकड्या, मोकळ्या जागा आणि सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपणावर



भर दिला जाणार आहे.

या उपक्रमात नागरिक, स्वयंसेवी संस्था, पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक संघटनांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. शहरातील टेकड्यांवरील वृक्षलागवडीसाठी लवकरच विशेष बैठक घेऊन नियोजन निश्चित करण्यात येणार असल्याचेही भिमाले यांनी सांगितले.

दरम्यान, विकासकामांच्या नावाखाली जुनी व ऐतिहासिक झाडे तोडण्यास परवानगी देऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. शंभर ते दोनशे वर्षे जुनी झाडे जतन करणे ही महापालिकेची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच बेकायदेशीर वृक्षतोड करणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एखादे झाड तोडल्यास त्याच्या बदल्यात किमान दुप्पट झाडे लावणे बंधनकारक आहे. या नियमाचे काटेकोर पालन करत वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन या दोन्ही बाबींवर महापालिका समान भर देणार असल्याचे श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### सपकाळांविरोधात काँग्रेस पक्षांतर्गत नाराजी;

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : दिल्लीमध्ये सध्या काँग्रेसच्या सर्व प्रदेशाध्यक्षांची बैठक सुरु आहे. या बैठकीला काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना हायकमांडनं दिल्लीला तातडीनं बोलावलं आहे. या बातमीला खुद्द पटोलेंनी पुष्टी दिली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याविरोधात पक्षांतर्गत नाराजी असल्याच्या बातम्या गेल्या काही दिवसांपासून येत आहेत. यापार्श्वभूमीवर पटोलेंना आलेलं हे बोलावणं महत्वाचं आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्याविरोधात पक्षांतर्गत नाराजी आहे, काही दिवसांपूर्वी त्यांच्याविरोधात काँग्रेसच्याच नेत्यांनी आंदोलनं केली होती. पुण्यात अरविंद शिंदे यांनी सपकाळांबद्दलच्या तक्रारीबद्दल थेट हायकमांडला पत्र लिहिलं होतं. त्यामुळं एक मोठी खळबळ उडाली होती. यापार्श्वभूमीवर दिल्लीत सध्या सुरु असलली प्रदेशाध्यक्षांची बैठक आणि या बैठकीला माजी प्रदेशाध्यक्ष असलेल्या नाना पटोले यांना बोलावल्यानं त्याची चर्चा सुरु झाली आहे. त्यामुळं आता नाना पटोले दिल्लीला गेल्यानंतर तिथं काय घडामोडी घडतात त्यानंतर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये नेमकी काय स्थिती आहे, हे स्पष्ट होऊ शकेल.

### मुंबईत एमआयएम पक्षाला खिंडार जिल्हाध्यक्षांचा राष्ट्रवादीत प्रवेश

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्रात वेगाने पसरत असलेल्या एआयएमआयएम पक्षाला नवी मुंबईत खिंडार पाडण्यात राष्ट्रवादीला यश आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश कार्यालयात नवी मुंबई एमआयएम पक्षाचे जिल्हाध्यक्ष समीर शेख, तुर्भे शहराध्यक्ष सद्दाम राईन, असलम कुरेशी यांच्यासह अन् पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हा पक्षप्रवेश सोहळा झाला. त्यांनी सर्वांचे पक्षात स्वागत करत त्यांच्या पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्या म्हणाल्या की, नवी मुंबईतील अन्य पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करून विकासाच्या राजकारणाला पाठिंबा दर्शवला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आणि स्व: अजितदादा पवार यांनी उभ्या केलेल्या जनसंपर्क व सर्वसमावेशक राजकारणाच्या विचारांना पुढे नेण्यासाठी आम्ही राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करत आहोत.

## कोट्यवधींच्या सायबर फसवणुकीचा मास्टरमाइंड बँकॉकमधून जेरबंद

### पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांची आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठी कारवाई!

जनप्रवास । प्रतिनिधी

पिंपरी : दुबई आणि थायलंडमधून सायबर फसवणुकीचे जाळे चालवणाऱ्या मुख्य सूत्रधाराला अखेर गजाआड केले आहे. इंटरपोलच्या रेड कॉर्नर नोटीस' आणि लुकआऊट सर्कुलर'च्या मदतीने थायलंडमधील बँकॉक विमानतळावर त्याला ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर भारतात आणून अधिकृत अटक करण्यात आली. पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठी कारवाई केली आहे.

सौरभ उर्फ गणेश बाळासो काळे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्या अटकेमुळे महाराष्ट्रासह देशातील अनेक मोठ्या सायबर गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. देहूरोड पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या ऑनलाइन टास्क फ्रॉडच्या तपासातून या आंतरराष्ट्रीय रॅकेटचा पर्दाफाश झाला. जून २०२४ मध्ये या



प्रकरणात १३ आरोपींना अटक करण्यात आली होती. चौकशीदरम्यान मुख्य सूत्रधार गणेश काळे दुबईतून संपूर्ण नेटवर्क चालवत असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांच्या माहितीनुसार, काळे भारतातील व्यक्तींकडून बँक खाती, एटीएम कार्ड, चेकबुक, इंटरनेट बँकिंग आयडी आणि पासवर्ड मिळवत होता. त्याबदल्यात पैसे दिले जात होते. या खात्यांचा वापर सायबर फसवणुकीतील रक्कम वळवण्यासाठी केला जात होता. त्याने दुबईत स्वतंत्र कार्यालयही उभारले होते. तांत्रिक तपासात आरोपीचे चीनसह इतर विदेशी नागरिकांशी संबंध असल्याचे समोर आले. टास्क फ्रॉड, शेअर मार्केट गुंतवणूक फसवणूक आणि डिजिटल अरेस्टसारख्या गुन्ह्यांमधून नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आली होती.

हिंजवडीतील १८ लाखांच्या आणि सायबर पो-लीस ठाण्यातील २ कोटी ६६ लाखांच्या फसवणूक प्रकरणातही त्याचा सहभाग आढळून आला. दरम्यान, सप्टेंबर २०२५ मध्ये तो दुबईहून बँकॉकला पळून गेला होता. मात्र, अखेर थायलंडमध्ये त्याला पकडण्यात यश आले.११ जून रोजी मुंबई विमानतळावर सायबर पोलिसांच्या पथकाने त्याचा ताबा घेतला. सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे तपास करीत आहेत.

## बांधावरील वादातून निवृत्त शिक्षकाचा कुऱ्हाडीने वार करुन खून

### शेजाऱ्याचा जीवघेणा हल्ला; श्रीगोंदा तालुक्यात खळबळ

जनप्रवास । प्रतिनिधी

श्रीगोंदा : शेताच्या बांधावर मुरूम टाकण्याच्या वादातून श्रीगोंदा तालुक्यातील पिसोरे खांड येथील गावडे मळा परिसरात निवृत्त शिक्षकाचा कुर्हाडीने खून झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. १२ जून) सकाळी घडली. या घटनेत पोपटराव रावजी गावडे (वय ७५) यांचा मृत्यू झाला असून, शेजारी राहणाऱ्या विलास दादा गावडे याच्याविरुद्ध श्रीगोंदा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोपटराव गावडे हे निवृत्त शिक्षक होते. त्यांच्या आणि शेजारी राहणाऱ्या विलास गावडे यांच्यात शेताच्या बांधावर मुरूम टाकण्याच्या कारणावरून अनेक दिवसांपासून वाद सुरू होता. शुक्रवारी सकाळी सातच्या सुमारास दोघांमध्ये पुन्हा याच कारणावरून शाब्दिक वाद झाला. त्यावेळी आरोपीने शिवीगाळ व दमदाटी केल्याचे समोर आले आहे.

यानंतर सकाळी नऊच्या सुमारास विलास गावडे हा हातात कुर्हाड घेऊन परिसरात फिरत असल्याची माहिती कुटुंबीयांना मिळाली होती. काही वेळातच त्याने पोपटराव गावडे यांच्या घरासमोरील शेतात जाऊन त्यांच्यावर अचानक हल्ला केला. कुर्हाडीने डोक्यात जोरदार वार केल्याने ते गंभीर जखमी झाले. कुटुंबीय आणि नातेवाईक घटनास्थळी पोहोचताच आरोपी तेथून पसार झाला. जखमी पोपटराव गावडे यांना तातडीने श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी विजय पोपटराव गावडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विलास दादा गावडे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके रवाना केली असून पुढील तपास सुरू आहे.

## मौजमजेसाठी दुचाकी चोरी करणारा अल्पवयीन ताब्यात; २.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : मौजमजेसाठी दुचाकी आणि रिक्षा चोरी करणाऱ्या एका अल्पवयीन मुलाला पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून दोन दुचाकी आणि एक रिक्षा असा एकूण २ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, भारती विद्यापीठ आणि कात्रज परिसरातून या अल्पवयीन मुलाने दुचाकी व रिक्षा चोरी केल्या होत्या. वाहन चोरीच्या घटनांचा



तपास सुरू असताना तो कात्रज येथील वंडर सिटी परिसरात येणार असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान अल्पवयीन मुलाने मौजमजेसाठी वाहन चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या दोन दुचाकी आणि एका रिक्षामुळे वाहन चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

ही कारवाई पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते, सहायक पोलीस आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील, उपनिरीक्षक नीलेश मोकाशी, मितेश चोरमले, सागर बोरगे आणि अभिनय चौधरी यांच्या पथकाने केली.

### पुरंदर विमानतळासाठी १ जुलैपासून सक्तीचे भूसंपादन

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी ३० जूनपर्यंत संमतीने भूसंपादन करण्यात येणार आहे. मात्र, १ जुलैपासून या प्रकल्पासाठी कायद्यानुसार सक्तीने भूसंपादन होणार आहे. जिल्हा प्रशासनाने संमतीपत्रासाठी दिलेली १० जूनची मुदत वाढवून मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली होती. त्यानुसार ही मुदतवाढ दिल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. विमानतळासाठी आतापर्यंत ९५० कोटी रुपयांचा मोबदला शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाला आहे.

## पावसाची प्रतीक्षा; उकाड्याने नागरिक हैराण

### जूनचा दुसरा आठवडा संपत आला तरी पावसाची हजेरी नाही

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : शहरात अद्याप मान्सूनपूर्व पावसाची म्हणावी तशी हजेरी लागलेली नसल्याने नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. जूनचा दुसरा आठवडा संपत आला तरी पाऊस न झाल्याने वातावरणात उष्णता आणि दमटपणा वाढला आहे.

मागील वर्षी मे महिन्यातील शेवटच्या पंधरा दिवसांत मान्सूनपूर्व पावसाने झोडपून काढले होते. यंदा मात्र पंधरवड्यापूर्वी झालेल्या एक-दोन



उन्हाळी पावसानंतर १२ जूनपर्यंत शहरात मान्सूनपूर्व पाऊस झाला नसून, उन्हाच्या झळा अधिक तीव्र झाल्या आहेत.

दिवसभर कडक ऊन आणि सायंकाळी उकाडा यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

यंदाही पावसाळ्याची तयारी म्हणून रेनकोट, छत्र्या, पावसाळी चप्पल व इतर साहित्याची खरेदी सुरू केली होती. शाळा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांसाठीही पालकांनी पावसाळी साहित्य खरेदी केले आहे. प्रवासाला जाताना पावसाळी साहित्य घेऊन जात आहेत, मात्र पावसाने अद्याप हजेरी न लावल्याने हे साहित्य वापरण्याची संधीच मिळालेली नाही.

उकाड्यामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. दुपारच्या वेळेत रस्त्यांवर तुलनेने कमी वर्दळ दिसून येत असून नागरिक शक्यतो घरातच राहण्यास प्राधान्य देत आहेत.

हवामानातील बदलांमुळे लवकरात लवकर मान्सून सक्रिय होऊन शहरासह परिसरात दमदार पाऊस पडावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पावसामुळे उकाड्यापासून दिलासा मिळण्याबरोबरच पाणीटंचाईची समस्या कमी होण्यास मदत होणार आहे.

## शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या आमिषाने १२ कोटींची फसवणूक

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास दरमहा पाच टक्के परतावा मिळेल, असे आमिष दाखवून ४५ गुंतवणूकदारांची सुमारे १२ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी खडक पोलीस ठाण्यात एमपीआयडी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे.

फिर्यादी गणेश घोलप यांच्या तक्रारीनुसार, आरोपीने राजपूत वाईज इन्व्हेस्टमेंट' कंपनीला सेबीची मान्यता असल्याचे भासवून २०२२ ते २०२५ दरम्यान गुंतवणूकदारांकडून पैसे घेतले. सुरुवातीला परतावा दिल्यानंतर त्याने पैसे देणे बंद केले.

प्राथमिक तपासात ४५ गुंतवणूकदारांकडून सुमारे १२ कोटी रुपये उकळल्याचे समोर आले असून पोलीस निरीक्षक मोहन खंदारे पुढील तपास करीत आहेत.



# अग्रलेख : 'बलशाली' सरकारकडून पुन्हा पोकळ निषेधच..!

काँग्रेस सरकारच्या काळात जेव्हा केव्हा पाक समर्थित दहशतवाद्यांकडून हल्ले होत तेव्हा भारत सरकारकडून या हल्ल्यांचा तीव्र निषेध व्हायचा. या तीव्र निषेधाच्या पलीकडे फार काही कारवाई केली जात नसे. त्यावेळी सध्या सत्तेत असलेले परंतु तेव्हा विरोधात असलेला भाजप आणि समविचारी पक्ष सरकारच्या या बोटचेपी भूमिकेची टिंगल करायचे. सरकारच्या या भूमिकेवर तेव्हा विरोधक अगदी तुटून पडत असत. सरकार राष्ट्रवादाशी समझोता करत आहे. सरकार पाकला घाबरत आहे. सरकार अमेरिकेविरोधात बोलण्याची हिंमत करत नाही, असे नानाविध आरोप विरोधक करत असत.

एवढेच काय, आताही त्यावेळच्या खपल्या काढत पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि विशेषत: जागतिक अर्थतज्ज्ञ मनमोहनसिंग यांच्यासारख्या महान नेत्यांच्या कार्यकर्तृत्वावरही आताही प्रश्नचिन्ह निर्माण करीत टीका केली जात आहे. त्याच त्या आरोपांद्वारे जनतेत काँग्रेस सरकार बाद होते, मनमोहनसिंग यांना तर ॲक्सिडेंटल पंतप्रधान म्हणून हिणवत काँग्रेस आणि सोनिया गांधींच्या हातचे बाहुले होते अशी खालच्या पातळीवर टीका केली जात आहे. वास्तविक सध्यस्थितीत सरकारच्या निष्क्रियतेवर पांघरुण घालण्यासाठी सध्याचे सरकार राष्ट्रहितासाठी जणू मोदी आणि सरकार जगात बेस्ट असल्याचा डांगोरा पिटला जात आहे. परंतु त्यांच्या निष्क्रियतेचा कारभार जगजाहीर असून, त्या कथित राष्ट्रवादीचे ढोंग करणाऱ्यांचे लोकांचे सरकार आता सत्तेत असून, त्यांचे पितळ अमेरिका-इराण युद्धाच्या निमित्ताने असो वा पाकच्या वारंवार भारतात होणाऱ्या घुसखोरी, हल्ल्यांमधील अपयश झाकोळून टाकण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जातो. अशावेळी त्यांची कदाचित राष्ट्रवादाची व्याख्या सोयीनुसार बदलत असावी, असे दिसून येते.

तसे नसते तर अमेरिकेच्या हल्ल्यात मारल्या गेलेल्या आपल्या तीन नाविक दलातील कर्मचाऱ्यांच्या मृत्यूचा खडसावून जाब सरकारने अमेरिकेला विचारला असता आणि केवळ जाबच विचारला नसता तर त्या विरोधात कठोर कारवाई देखील केली असती, परंतु तसे काहीही झालेले नाही. अमेरिकेने आमचे तीन लोक मारले आणि हे सरकार केवळ तीव्र निषेध व्यक्त करून गप्प बसले. इराणच्या आखातात गेल्या तीन दिवसापासून पुन्हा युद्धाला सुरुवात झाली आहे. या संघर्षा दरम्यान मागील तीन दिवसांत भारतीय खलाशी असलेल्या दोन जहाजांना अमेरिकेने लक्ष्य केले आहे.

ओमानच्या समुद्रात जहाजांवर हल्ले करण्यात आले. बुधवारी अमेरिकेने २४ भारतीय खलाशी असलेल्या 'टँकर सेटेबेल्लो' या जहाजावर हल्ला केला होता. या हल्लयात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर २१ जणांना ओमानच्या हवाई दलाने वाचवले आहे. या हल्ल्याच्या दोन दिवसांपूर्वी 'मॅरिव्हेक्स' या जहाजावर हल्ला करण्यात आला होता. 'मॅरिव्हेक्स' जहाजावर असलेल्या २४ भारतीय खलाशांना सुखरूप वाचवण्यात आले होते, नेहमीप्रमाणे या घटनेवर चिंता व्यक्त करीत भारताने पुन्हा एकदा नेहमीप्रमाणेच भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि हित आमच्यासाठी सर्वतोपरी आहे, असे म्हटले आहे. भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि हित भारतासाठी सर्वतोपरी असेल तर त्या दृष्टीने तशी कारवाई देखील अपेक्षित आहे. विशेष म्हणजे या हल्ल्याबाबत अमेरिकेने कोणतीही खंत व्यक्त केलेली नाही. ओमानच्या किनारपट्टीजवळ असलेल्या 'सेटेबेल्लो' या व्यावसायिक जहाजावर केलेल्या हल्ल्याचा व्हिडिओ अमेरिकेने पोस्ट केला आहे. व्यावसायिक जहाजांवर झालेल्या हल्ल्याबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी अभिमान व्यक्त केला आहे. अमेरिकेने सेटेबेल्लो ऑईल टँकर जहाजाच्या थेट इंजिन रूमवर हल्ला केला. त्यावेळी जहाज होर्मुझ सामुद्रधुनीच्या जवळ व ओमानच्या आखातात होते.

या हल्ल्यानंतर जहाजात आग लागली. अमेरिकन नौदलाची नाकाबंदी भेदल्यामुळे ओमानच्या आखातात हा हल्ला करण्यात आल्याची माहिती अमेरिकन लष्कराने दिली. या घटनेनंतर भारताने बुधवारी अमेरिकेचे प्रभारी राजदूत जेसन मीक्स यांना समन्स बजावले. ओमानच्या किनारपट्टीवर 'सेटेबेल्लो' या व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध केला. आखाती प्रदेशात वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर या हल्लयाबाबत चिंता व्यक्त केली. भारताच्या कथित चिंतेला अमेरिका काडीचीही किंमत देत नाही हे ट्रम्प यांच्या वक्तव्यावरून दिसून आले आहे.

अमेरिकेने हल्ला केलेले जहाज भारतीय मालकीचे नसले तरी त्या जहाजावरील कर्मचारी भारतीय होते आणि त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी भारताची होती. त्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या मृत्यूसाठी भारत सरकार देखील तितकेच जबाबदार आहे. अमेरिकेच्या कोणत्याही नागरिकांवर जगात कुठे हल्ला झाला तरी अमेरिका सरकार त्या देशावर कठोर कारवाई करण्यास मागेपुढे पाहत नाही. प्रसंगी लष्करी कारवाई देखील करते. इस्त्रायलदेखील आपल्या प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षेसाठी कोणत्याही थराला जाऊन कारवाई करण्याचे धाडस दाखवतो. भारताने अगदी तसेच करावे अशी अपेक्षा नसली तरी किमान पुढच्या वेळी तरी विदेशातील भारतीय नागरिकांवर हल्ले करण्याची हिम्मत कोणताही देश करू शकणार नाही इतपत कठोर भूमिका भारताने स्वीकारायला हवी. या प्रसंगात अमेरिकेकडून किमान दिलगिरीची अपेक्षा होती, परंतु तसे काही झालेले नाही आणि भारताने देखील तीव्र निषेधाच्या पलीकडे फारसे काही केलेले नाही. एवढेच काय तरढासळलेली अर्थव्यवस्था आणि अमेरिकेकडून भारताची गळचेपी हे सध्याच्या सरकारच्या निष्क्रियतेचे द्योतक आहे.

# महात्मा गांधींप्रमाणे मोदींमध्ये 'तीच' ताकद



## राजकारण

### खा. सुप्रिया सुळे यांचे व्याही आ. अरुण लखानींचं वादग्रस्त विधान



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १२ वर्षांच्या कार्यकालासह सर्वाधिक काळ पंतप्रधानपदाचा विक्रम मोडित काढला आहे. त्यांची देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासोबत तुलना करण्यात येत असतानाच आता महात्मा गांधी यांच्याशीही त्यांची तुलना करण्यात येत आहे. 'महात्मा गांधींनी आवाहन केलं की देश ऐकायचा; मोदींमध्येही तीच ताकद' असल्याचे सुप्रिया सुळेंचे व्याही व भाजपचे नूतन विधान परिषदेचे बिनविरोध निवडून आलेले आ. अरुण लखानी यांनी केलं आहे.

पंतप्रधान मोदींनी दोन दिवसांपूर्वी सलग १२ वर्षांच्या कार्यकालाची पूर्ती केल्यानंतर पंडित नेहरू यांचा पंतप्रधानपदाचा विक्रम मोडित काढला. त्यावरून पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलना करण्यात येत असतानाच आता महात्मा गांधी यांच्याशीही त्यांची तुलना करण्यात येत आहे. चंद्रपूर स्थानिक स्वराज्य संस्थेतून विधान परिषदेवर बिनविरोध निवडून आलेले भाजप नेते, उद्योजक आ. अरुण लखानी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलना थेट महात्मा गांधींशी करत एक विधान केल्यामुळे नव्या राजकीय चर्चांची शक्यता आहे. ते राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांचे व्याही असून नुकताच सुप्रिया यांची कन्या रेवती व लखानी यांच्या चिरंजीवांचा साखरपुडा झाला आहे. दरम्यान अचानकपणे लखानी यांना चंद्रपूरमधून विधान परिषदेवर भाजपकडून उमेदवारी देण्यात आली. त्यात महाविकास आघाडीअंतर्गत वाटणीस आलेल्या जागेवर काँग्रेसकडून विरोधात अर्जही भरण्यात आलेला नाही. परिणामी त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. आता आ. अरूण लखानी यांनी मोदींच्या नेतृत्वाचे कौतुक करताना गांधीजींप्रमाणेच लोकांवर प्रभाव टाकण्याची क्षमता मोदींमध्ये असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

**काय म्हणालेत अरूण लखानी?**

एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना अरुण लखानी म्हणाले, महात्मा गांधी उपवासाचं आवाहन करायचे आणि संपूर्ण देश ते पाळायचा. तशी क्षमता आणि तसाच आदर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल लोकांच्या मनामध्ये आहे. मोदींनी आवाहन केलं की लोक प्रतिसाद देतात. त्यांनी काटकसर करण्याचं आवाहन केलं आणि लोकांनी इंधनाचा वापर कमी करण्यास सुरुवात केली, असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

यावेळी बोलताना त्यांनी आपल्या कुटुंबातील एका घटनेचा देखील उल्लेख केला. मोदींच्या आवाहनानंतर आमच्या घरातूनही रेवती आणि सारंग यांच्या रिसेप्शनचा कार्यक्रम पुढे ढकलण्याबाबत चर्चा झाली. त्यानुसार २७ नोव्हेंबरला होणारा स्वागत समारंभ १६ डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आला. पत्रिका छापून वाटल्या होत्या, त्यामुळे काही गोंधळ झाला. मात्र लग्न नियोजित वेळेतच होणार आहे.

**मोदींच्या १२ वर्षांच्या कार्यकाळाचं कौतुक**

मोदींचा हा १२ वर्षांचा कालावधी भारतासाठी सुवर्णकाळ ठरला आहे. देशाचा विकास झाला, जगभरात भारताचा सन्मान वाढला. महिला, गरीब आणि वंचित घटकांसाठी राबवलेल्या योजना क्रांतिकारी ठरल्या असल्याचं सांगत त्यांनी मोदींचं कौतुक केलं आहे.

**काँग्रेसने माघार का घेतली? लखानी म्हणाले**

लखानी म्हणाले, महायुतीकडे स्पष्ट संख्याबळ होते. त्यामुळे काँग्रेसला विजयाची आशा नसल्याने व लढवून फायदा नसल्याने त्यांनी माघार घेतली

**राष्ट्रवादी-काँग्रेस विलीनीकरणावर साधलं मौन**

शरद पवार राष्ट्रवादीचे काँग्रेसमध्ये विलिनीकरणाच्या चर्चा सुरू आहेत. याबाबत विचारता आ. लखानी यांनी सावध भूमिका मांडत म्हटलं की, मी राजकारणात नवीन आहे. अनेक वर्षे राजकारणात असलेल्या लोकांनाही या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. त्यामुळे मी यावर भाष्य करणे टाळतो, असंही त्यांनी बोलताना म्हटलं आहे.

### मोदींचा सुवर्णकाळ महिला, गोरगरिबांसाठी क्रांतिकारी

आ. लखानी म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा गेल्या १२ वर्षांतील कालावधी हा सुवर्णकाळ आहे. या कालावधीत भारताचा विकास होत असून, महिला आणि गरिबांसाठी आलेल्या योजना क्रांतीकारी आहेत. तब्बल ३५ देशांमध्ये त्यांना गौरविण्यात आले असून, त्यानिमित्ताने जगभरात भारताला आदर मिळत आहे. भारताची अर्थव्यवस्था मजबूत होण्याबरोबरच उद्योग-व्यवसाय आणि शेतीला अधिक प्रमाणात चालना मिळत आहे, जी यापूर्वी कधीच मिळाली नाही.

## अंतरंग



### फुटबॉलचा जागतिक महासोहळा...!



क्रिकेट खेळाला सर्वाधिक ग्लॅमर असले तरी हा खेळ ठराविक हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच देश खेळतात. उलट जगभरात सर्वाधिक खेळला जाणारा खेळ म्हणजे फुटबॉल. मन, मनगट, मेंदू आणि एकूणच शरीराला व्यायाम देणारा आणि तंदुरुस्तीचा खेळ म्हणजे फुटबॉल. अशा या फुटबॉलचा सर्वाधिक मोठा सामन्यांचा सोहळा म्हणजेच जगभरातील फुटबॉल स्पर्धेचा महासोहळा म्हणजेच 'फिफा वर्ल्ड कप २०२६'चा थरार सुरू झाला असून अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये ३९ दिवस चालणाऱ्या या महासंग्रामात ४८ संघ १०४ सामन्यांमध्ये एकमेकांशी भिडणार, यात गतविजेता अर्जेंटिना पुन्हा एकदा जेतेपद राखण्यासाठी मैदानात उतरणार आहे. जगातील सर्वात लोकप्रिय खेळ म्हणजे फुटबॉल. या खेळाला महाकुंभ म्हणून फिफा विश्वचषकाकडे पाहिले जाते. आजपासून २३ व्या फिफा विश्वचषक स्पर्धेला सुरुवात झाली आहे.

आजवर झालेल्या सर्व विश्वचषकांच्या तुलनेत यंदाची स्पर्धा सर्वात मोठी ठरणार आहे. तीन यजमान देश, ४८ संघ, १६ स्टेडियम, ३९ दिवस आणि १०४ सामने अशी भव्य मेजवानी फुटबॉलप्रेमींना अनुभवता येणार आहे. फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धांना शानदार प्रारंभ झाला असून, १९ जुलै २०२६ अखेर अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांमध्ये संयुक्तपणे खेळवली जात आहे. इतिहासात प्रथमच तब्बल ४८ संघ या स्पर्धेत सहभागी झाले असून एकूण १०४ सामने आयोजित करण्यात आले आहेत. अमेरिकेतील ११, मेक्सिकोमधील ३ आणि कॅनडामधील २ अशा एकूण १६ शहरांमध्ये सामने रंगणार आहेत. स्पर्धेचा महाअंतिम सामना १९ जुलै रोजी अमेरिकेतील न्यू जर्सी राज्यातील मेटलाइफ स्टेडियम येथे खेळविण्यात येणार आहे. हा विश्वचषक फुटबॉलच्या इतिहासातील सर्वात मोठा आणि भव्य सोहळा ठरणार आहे. फुटबॉल हा जगातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ मानला जातो.

भाषा, धर्म, वंश, संस्कृती आणि भौगोलिक सीमा ओलांडून लोकांना एकत्र आणण्याची अद्वितीय ताकद या खेळात आहे. जगातील जवळपास प्रत्येक देशात फुटबॉल खेळला जातो आणि त्याचे लाखो नव्हे तर अब्जावधी चाहते आहेत. या खेळाचा सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा सोहळा म्हणजे फिफा विश्वचषक. दर चार वर्षांनी आयोजित होणारा हा विश्वचषक केवळ एक क्रीडा स्पर्धा नसून जगभरातील फुटबॉलप्रेमींसाठी एक भावनिक उत्सव असतो. विश्वचषकाची घोषणा होताच चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होते आणि स्पर्धा सुरू होताच संपूर्ण जग फुटबॉलमय बनते. फुटबॉल विश्वचषकाची सुरुवात १९३० मध्ये झाली. पहिल्या स्पर्धेचे आयोजन उरुग्वे येथे करण्यात आले होते. त्या वेळी केवळ १३ संघ सहभागी झाले होते. कालांतराने या स्पर्धेची लोकप्रियता इतकी वाढली की आज जगातील जवळपास प्रत्येक देश विश्वचषकाच्या पात्रता फेरीत सहभागी झालेत.

दुसऱ्या महायुद्धामुळे १९४२ आणि १९४६ मध्ये विश्वचषकाचे आयोजन होऊ शकले नाही; मात्र त्यानंतर ही परंपरा अखंडपणे सुरू राहिली. गेल्या अनेक दशकांत या स्पर्धेने जगाला अनेक दिग्गज खेळाडू दिले. पेले, दिएगो मॅराडोना, झिनेदिन झिदान, लिओनेल मेस्सी आणि क्रिस्टियानो रोनाल्डो यांसारख्या महान खेळाडूंनी आपल्या अद्वितीय कौशल्याने आणि अप्रतिम कामगिरीने फुटबॉलप्रेमींना मंत्रमुग्ध केले. त्यामुळे विश्वचषक हा केवळ संघांमधील स्पर्धा न राहता महान खेळाडूंच्या गुणवत्तेची आणि कर्तृत्वाची कसोटी ठरला. फुटबॉल विश्वचषक हा जगातील सर्वाधिक पाहिला जाणारा क्रीडा सोहळा मानला जातो. स्पर्धेतील प्रत्येक सामना लाखो-कोट्यवधी प्रेक्षक दूरचित्रवाणी, डिजिटल माध्यमे आणि स्टेडियममधून पाहतात. अंतिम सामन्याला तर जगभरातील अब्जावधी प्रेक्षकांची उपस्थिती लाभते. अनेक देशांमध्ये कार्यालये, शाळा आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या पडद्यांवर सामने दाखवले जातात. फुटबॉल हा गरीब-श्रीमंत, शहर-गाव तसेच विकसित आणि विकसनशील देशांतील सर्व स्तरांतील लोकांना जोडणारा खेळ असल्याने त्याचा प्रेक्षकवर्ग अत्यंत व्यापक आहे. त्यामुळे विश्वचषक हा केवळ क्रीडा स्पर्धा न राहता जागतिक सांस्कृतिक उत्सवाचे स्वरूप धारण करतो. अशा प्रकारे, फुटबॉल विश्वचषक हा जगातील सर्वात मोठा आणि प्रभावशाली क्रीडा महोत्सव आहे. तो केवळ खेळाचा उत्सव नसून विविध देशांतील लोकांना एकत्र आणणारा, मैत्री, एकता आणि क्रीडाभावनेचा संदेश देणारा जागतिक सोहळा आहे.

**– डॉ. हर्षदा पाटील**

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ अधिक ज्येष्ठशके संवत्- १९४८ संवत्सर -पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ मास-अधिक ज्येष्ठ ऋतु- सौर ग्रीष्म कृष्ण पक्ष तिथि : त्रयोदशी १६ : ०७ : ५९ नक्षत्र : कृत्तिका २५ : १६ : ४१+ योग : सुकर्मा १७ : २७ : ५८ करण : वणिज १६ : ०७ : ५९ करण : विष्टि २६ : १५ : ४१+ सूर्य : वृषभ चन्द्र : वृषभ ०९ : २५ : ०८ हिजरी सन् - १४४७ मुस्लिम मास -जिल्हेज तारीख - २७ विशेष शिवरात्री

## राशी भविष्य...

**मेष** – कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चिततेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील. व्यापारात कोणावरही विश्वास दाखवू नका. कर्ज घेण्याची वेळ येऊ शकते.

**वृषभ** – आपले प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील. शिक्षणात यश मिळेल. वेळेचा दुरुपयोग करू नका.

**मिथून** – व्यावसायिक योजना गुप्त ठेवा. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधपणा ठेवा. मुलांच्या बाबतीत काळजी वाटेल. देवाधर्मावरील विश्वास वाढेल.

**कर्क** – कौटुंबिक समस्या आणि स्थावर मालमत्ता या संबंधातील समस्या दूर होतील. समाजात प्रतिष्ठा मिळाल्याने आनंदी रहाल. कोणाचाही द्वेष करू नका.

**सिंह** – मुलांच्या प्रगतीमुळे मन प्रसन्न राहील. आर्थिक आवक चांगली राहील. वाचनाची गोडी वाढेल. राहण्यासाठी घराची चिंता दूर होईल. मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल.

**कन्या** – बौद्धीक अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग मोकळे होतील. फायदेशीर प्रवास होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील वयस्कर व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी घ्या.

**तूळ** – कामकाजामध्ये वाढ होईल अनुकूल स्थिती राहणार आहे. वेळेचा चांगला उपयोग करून आपल्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामकाजाला सुरुवात करा.

**वृश्चिक** – भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील. आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल.

**धनू** – रचनात्मक कामात यश मिळेल. आर्थिक योग उत्तम आहे. कुटुंबातील व्यक्तिंचे सहकार्य घ्या. प्रभावी वातावरणाचा उपयोग होईल. अती उत्साहीपणा दाखवू नका.

**मकर** – वाद-विवाद संपुष्टात येतील. नोकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्य करीत असल्यामुळे मान सन्मान मिळेल.

**कुंभ** – नातेवाइकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. कौटुंबिक समस्या दूर होईल. शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल.

**मीन** – व्यवसायामध्ये अनकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल. खर्चामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल.

## पारावरचा फड



देशभरात भाजपचा वाढता दबदबा आणि त्यासाठी सुरू असलेल्या साम-दाम-दंडासमोर सर्वजणच गलितगात्र ठरत असल्याचे चित्र आहे. विशेषत: पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींच्या पराभवानंतर तृणमूलमध्ये लागलेल्या गळतीला आता काँग्रेसमध्ये विलिनीकरणाचे मलम लावण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. एवढेच काय तर काँग्रेसमध्ये तृणमूल काँग्रेसचे विलिनीकरण झाल्यास इंडिया आघाडीचे उपाध्यक्षपद ममताजींना देण्याची ऑफरही दिल्याची चर्चा आहे. इकडे शरद पवार राष्ट्रवादी असो वा शिवसेना उबाठा फोडाफोडीनंतर दोन्ही पक्षही अडचणीत आले आहेत. एकूणच काय भाजपविरोधात टिकायचे असेल तर एकीची मोट बांधायला हवी असा राग आळवला जात असून, त्यात काँग्रेसमध्ये विलिनीकरण आणि काँग्रेसला बळकटी देणे अशा शक्कल लढविल्या जात आहेत. उबाठा नेते खा. संजय राऊतांनी तसा सूर काढत सूचना देण्याचा प्रयत्न केला. अगोदरच काँग्रेस अस्तित्वाची लढाई लढत असताना त्यात विलीनीकरण म्हणजे बुडत्याचा पाय खोलात...याबाबत पारावरची चर्चा...!

**पांडूनाना :** भाजप आसुद्या न्हायतर म्हायुती जोरात हाय बग. इरोदकाचं सपशेल लोटांगनच चाललंया.

**बाबूराव :** आरं जितं समदं थांबतंया तितनंच भाजपची सुरुवात हुतीया. त्येंचं सत्तेचं २४ तास राजकारन हाय.

**पांडूनाना :** आक्शी बराबर हाय. त्येंचं साम, दाम, दंड सुरू आसताना टिकनार कोन?

**बाबूराव :** बग न्हवं, त्या बिचाऱ्या ममतास्नी पश्चिम बंगालमदी सत्तेतनं घालिवलंच. मागोमाग आमदार, खासदार बी फोडाय लागल्याती. भाजपमागं जात्याती.

**पांडूनाना :** आरं भाजपचं शत परतीशत हेच हाय.

**बाबूराव :** आशानंच आता पंजाब आन् इतर इलेक्शानबी जिकत्याल भाजपवालं.

**पांडूनाना :** ते काय का आसंना, पर इरोदकास्नी आता एक व्हाय हावं म्हनं.

**बाबूराव :** खराय, त्यासाटीच आता कांगरेस एकसंद व्हावं म्हंत्यात. त्यात इलीनीकरन करून.

**पांडूनाना :** त्यो परयाय हुवू शकतो म्हन. न्हायतर पवारांची राष्टरवादी आसो, ममतांची न्हायतर बिजू पटनायक समद्यांचं कांगरेसचंच मूळ हाय.

**बाबूराव :** त्यो काळ येगळा हुता. पर आता कांगरेसवाल्यास्नी सवताचंच सावरता येईना आन् ह्यानी त्येंच्यात मिसळावं म्हजी येगळंच.

**पांडूनाना :** आता काय, बुडत्याला काडीचा आदार आसं हुईल. समदी एकमेकाचा हात धरावा आसा राऊतसायब म्हंत्यात.

**बाबूराव :** त्येंचं काय करनार आन् कुटं इलिनीकरन?

**पांडूनाना :** सल्ला देनं सोपं आसतं. तेच करत्यात ते.

**बाबूराव :** पन कांगरेसचं आमच्यासंगं या म्हननं म्हजी हाम तो डुबेंगे, तुमको बी डुबायेंगे **– अमृत चौगुले**

## उपदेश कथा



**ईश्वर तो पाहील**

शेख सादी आपल्या वडिलांच्या बरोबर मक्केला जात होते. मंडळींचा नियम असा होता की, पहाटे अगदी लवकर उठून ईश्वराची प्रार्थना करायची. एके दिवशी सादी लवकर उठले आणि त्याने ईश्वराची प्रार्थना केली. प्रार्थना झाल्यावर इतर काही लोक स्वस्थ निजलेले त्याने पाहिले. त्यांना पाहून सादी वडिलांना म्हणाले, ''बाबा, हे पाहा आळशी लोक ! प्रार्थनेला न उठता स्वस्थ निजले आहेत.'' सादीचे पिता सुफी होते. तो म्हणाले, ''बेटा सादी ! तू उठला नसतास तर बरे झाले असते. तुझी प्रार्थना वाया गेली. ईश्वराचे लक्ष त्यांच्याकडे आहे. त्यांचा दोष काढण्याचा अधिकार आपल्याला नाही. प्रार्थना झाल्यावर दुसऱ्याची निंदा करणे ईश्वराला कसे आवडेल?''

**कथा उपदेश : परनिंदा करणे कधीही वाईटच.**

## दिनविशेष...



**आंतरराष्ट्रीय**

१८४ - आधी आगगाडीत बसायला तयार नसलेल्या राणी व्हिक्टोरियाने आगगाडी लोकप्रिय व्हावी म्हणून आगागाडीतून पहिल्यांदा प्रवास केला.

१८९३ - महिलांची पहिली जागतिक गोल्फ स्पर्धा मागरिट स्कॉट यांनी जिंकली.

२००२- अफगाणिस्तानात अध्यक्षपदासाठी पहिली निवडणूक. हमीद करझाई राष्ट्रध्यक्ष बनले.

**राष्ट्रीय**

१८१७ - दुसऱ्या बाजीरावने खडकीची लढाई पर्वतीवरून दुर्बिणीने बघितली. याच दिवशी नंतर पेशवे आणि इंग्रज यांच्यामध्ये तह झाला.

१८४०- सरदार उधमसिंग यांनी ब्रिटिशांनी फासी दिली.

१९५१- प्रेम माथूत या महिलेला प्रवासी विमान चालविण्याचा परवाना मिळाला. त्या पहिल्या भारतीय महिला वैमानिक ठरल्या.

२००४- भारत-रशिया संयुक्त निर्मिती ब्राह्मोस क्षेपणास्त्रांची चांदिपूर येथे यशस्वी चाचणी.

२००८ - उत्तर भारतीयांबाबत प्रक्षोभक विधाने केल्याप्रकरणी दाखल झालेल्या खटल्याच्या सुनावणीसाठी उपस्थित न राहिल्याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात जमशेदपूर येथील स्थानिक न्यायालयाने वॉरंट काढले.

## वाचनाचा नवा प्रवास

मुंबईतील पश्चिम रेल्वेने चर्चगेट स्थानकात प्रवाशांसाठी 'लायब्ररी जंक्शन' या अभिनव संकल्पनेअंतर्गत मोफत सार्वजनिक वाचनालय सुरू केले आहे. मुंबईतील रेल्वे स्थानकावर सुरू झालेले हे अशा प्रकारचे पहिलेच वाचनालय आहे. प्रवासादरम्यान वाचनाची सवय जोपासण्यास आणि वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी पश्चिम रेल्वेचा हा स्तुत्य उपक्रम आहे. दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेट कर्णधार एबी डिव्हिलियर्स यांच्याहस्ते या वाचनालयाचे उदघाटन करण्यात आले. चर्चगेट स्थानकाच्या दक्षिण कॉन्कोर्स परिसरात उभारलेल्या या वाचनालयात विविध विषयांवरील अनेक उपयुक्त पुस्तकांचा संग्रह उपलब्ध आहे. सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत ग्रंथपालाची सेवाही उपलब्ध राहणार आहे. मुंबईतील नागरिक, शाळा आणि विविध संस्थांकडून पुस्तकदानाच्या माध्यमातून या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. 'रीड मुंबई' या प्रकल्पाचा भाग असलेल्या 'लायब्ररी जंक्शन'मुळे प्रवाशांना वाचनाची नवी संधी उपलब्ध होणार आहे. हे विशेष असेच म्हणावे लागेल, अशा प्रकारचे 'लायब्ररी जंक्शन' देशभरातील विविध रेल्वे स्थानकांवर सुरू झाले पाहिजेत, जेणेकरून वाचन संस्कृतीला चालना मिळेल आणि पुस्तके वाचण्याकडे लोक आकर्षित होतील.

**–दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

## जन की बात...



### बिनविरोध की घोडेबाजार?



राज्यात उन्हाचा तडाखा जरी कमी झाला असला तरी, राज्याच्या राजकारणात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीचे राजकारण मात्र चांगलेच तापले आहे. १७ जागांसाठी होत असलेली ही निवडणूक 'बिनविरोध' आणि 'घोडेबाजार' या मुद्यांवरुन मात्र चांगलीच चर्चेत आली आहे. सत्ताधारी 'महायुती'ने साम-दाम-दंड- भेद आणि घोडेबाजार या पंचसूत्रीचा वापर करत, आतापर्यंत ६ जागा 'बिनविरोध' म्हणून पदरात पाडून घेतल्या आहेत. अमरावतीच्या जागेसाठीही तसे प्रयत्न चालू आहेत, असो. या निवडणुकीत सर्वात जास्त 'हायलाईट' झाले ते नाशिक आणि जळगाव मतदारसंघ. नाशिकची जागा शिवसेनेसाठी सोडण्यात आली होती. नरेंद्र दराडे हे शिवसेनेचे अधिकृत उमेदवार आहेत. परंतु, भाजपच्या बंडखोर कैलास गितेंनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरून बंडखोरीचे निशाण फडकवले आहे. त्यांनी माघार घ्यावी, म्हणून मंत्री सावंत आणि गिरीश महाजन आठवडाभर नाशकात तळ ठोकून आहेत. पण, गितेंच्या 'नाकदु-या' काढण्यात त्यांना अजूनही यश आले नाही. शेवटी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यासाठी दिल्ली दरबारी धाव घ्यावी लागली. त्यांनातर आता गीतेनी अखेर माघार घेतली आहे. त्यावेळी त्यांनी समाजमाध्यमावर केलेली पोष्ट मोठ्या चर्चेत आळी आहे. निवडणूक आहे, संविधान आणि लोकशाही विचारात घेता, कोणालाही निवडणूक लढण्याचा अधिकार आहे. उमेदवाराने स्वइच्छेने माघार घेतली तर ठीक. पण, आपल्या उमेदवारासाठी दोन मंत्र्यांनी आठ दिवस नाशकात तळ ठोकणे आणि उपमुख्यमंत्र्यांनी दिल्ली दौरा करणे, हा किळसवाणा 'लाचारपणा' तर आहेच, पण, लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेसाठी अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. निवडणूक आहे, ती होऊद्याना. जो निवडून यायचा तो निवडून येईल. तुम्ही मतदारांचा हक्क का हिरावून घेता? आपल्या स्वार्थासाठी दोन मंत्र्यांनी आणि एका उपमुख्यमंत्र्याने इतके लाचार व्हावे, हा लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थेचा घोर अपमान आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. त्यांची ही शिष्टाई अखेर गीतेंच्या माघारीने फलास गेली आहे.

**– प्रदीप व्ही. खोलमकर, नाशिक.**

## अपघातांमुळे 'बेस्ट'ची प्रतिष्ठा धोक्यात

खरे तर लोकल ट्रेननंतर 'बेस्ट' ही मुंबईकरांची दुसरी जीवनवाहिनी असून मुंबईकरांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. कारण १२५ हून अधिक वर्षांचा वारसा लाभलेली 'बेस्ट' सेवा देशातच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडात सर्वोत्कृष्ट वाहतूक सेवा मानली जाते. पण दुर्दैवाने गेल्या काही वर्षातील सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे बेस्टच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचला आहे. 'बेस्ट'च्या अधिकृत अहवालानुसार गेल्या ३ वर्षांत झालेल्या ९५८ अपघातात ७७ जणांचा बळी गेला तर २१७ जण जखमी झाले. विशेष म्हणजे या एकूण अपघातांपैकी ८५ टक्क्यांहून अधिक अपघात हे खासगी कंत्राटदारांच्या बसेसचे आहेत. प्रथम दर्शनी हे सर्व अपघात प्रामुख्याने चालकाच्या चुकीमुळे झालेले दिसत असले तरी या अपघातांना इतरही अनेक कारणे आहेत. 'बेस्ट' बस अपघातांच्या वाढत्या संख्येमागे केवळ चालकांचा निष्काळजीपणा हे एकमेव कारण नाही. या अपघातांची दुसरी बाजू समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. यामध्ये बेजबाबदार कंत्राटी बस कंपन्या, प्रशासकीय त्रुटी, इलेक्ट्रिक बसेस, मुंबईतील वाढती वाहतूक कोंडी आणि मुंबईच्या रस्त्यांची सद्यस्थिती कारणीभूत आहे. फुटपाथवर बसलेले अनधिकृत फेरीवाले आणि अनधिकृत पार्किंग यामुळे अपघात झाले आहेत. 'बेस्ट' सेवेची वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे प्रतिष्ठा धोक्यात आली आहे.

**– प्रदीप मोरे, मुंबई**

# सोलापूर महामार्गावर ‘लाईटस्टॉर्म टेलिकॉम नेटवर्क प्रा. लि.’ कंपनीची मनमानी

## एनएचएआयच्या आदेशाला वाटाण्याच्या अक्षदा, जीवघेण्या खोदकामामुळे धोक्याची घंटा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** पुणे–सोलापूर महामार्गावर (एनएच–६५) मेसर्स लाईटस्टॉर्म टेलिकॉम नेटवर्क प्रा. लिमिटेड कंपनीने चालवलेली बेकायदेशीर खोदकामाची मोहीम आता साक्षात मृत्यूचा सापळा बनली आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) काम थांबवण्याचे स्पष्ट आदेश देऊनही, ही कंपनी नियमांना धाब्यावर बसवून काम करत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

लाईटस्टॉर्म कंपनीने ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यासाठी केलेल्या बेजबाबदार खोदकामामुळे संरक्षण विभागाच्या अत्यंत महत्त्वाच्या 'एनएफएस ओएफसी' लाईन्सचे नुकसान झाले आहे. एनएचएआयच्या अहवालानुसार, किमी ५०/०००, ५३/४००, ५९/७००, ५९/८५०, ५९/९०० आणि ८२/४०० या ठिकाणी केबल्सचे गंभीर नुकसान झाले असून, यामुळे दळणवळण व्यवस्थेत मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

> महामार्गाच्या कडेला पसरलेला हा मातीचा ढिगारा आणि उघड्या केबल्स कोणत्याही क्षणी मोठ्या दुर्घटनेला कारणीभूत ठरू शकतात. आता 'प्रशासकीय कारवाई' केवळ पत्रांपुरती मर्यादित न राहता, प्रत्यक्ष कृतीतून दिसावी, अशी मागणी संतप्त नागरिक करत आहेत.

एनएचएआयच्या पुणे कार्यालयाने २१ मे २०२६ रोजी कंपनीला सक्त ताकीद देऊन काम त्वरित थांबवण्याचे आणि ७ दिवसांत दुरुस्ती करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. तरीही, १२ जून रोजी प्राप्त झालेल्या वृत्तानुसार, वाखरी चौफुला परिसरात अद्यापही नियमबाह्य आणि विनापरवाना खोदकाम सुरूच आहे. ही थेट प्रशासकीय आदेशांची पायमल्ली असून, कंत्राटदाराची मुजोरी किती वाढली आहे, याचे हे निदर्शक आहे. पावसाळा तोंडावर असताना कोणताही सुरक्षा उपाय न करता महामार्गाच्या कडेला केलेले हे खोल खोदकाम अपघातांना निमंत्रण देत आहे. स्थानिक नागरिकांनी या संदर्भात यवत पोलीस ठाणे आणि एनएचएआयच्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही, अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. एनएचएआयने परवानगी रद्द केली असतानाही काम सुरू राहणे, हे



प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे.

यासंदर्भात काही सामाजिक कार्यकर्त्यांनी व जागरूक नागरिकांनी एनएचएआयने केवळ पत्रव्यवहार न करता, या कंपनीवर त्वरित फौजदारी गुन्हे दाखल करावेत, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपनीची बँक गॅरंटी त्वरित जप्त करून त्यांना काळ्या यादीत टाकावे, जीवितहानी झाल्यास त्याला जबाबदार कोण? याची उत्तरे आता प्रशासनाने द्यावीत अशी मागणी केली आहे.

## रूपाली चाकणकर यांच्याविरोधात कारवाईची मागणी; गुलाबो गँगचे बालगंधर्व चौकात आंदोलन




■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** रूपाली चाकणकर यांच्याविरोधात तात्काळ कारवाई करून त्यांना अटक करण्यात यावी, अशी जोरदार मागणी माजी नगरसेविका संगीता तिवारी यांनी केली. कारवाई करण्यात विलंब झाल्यास संपूर्ण पुणे शहरातील प्रमुख चौकांमध्ये आंदोलन, रस्तारोको तसेच चक्का जाम आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

बालगंधर्व चौक येथे गुलाबो गँगच्या वतीने आंदोलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी आंदोलक महिलांनी रूपाली चाकणकर यांच्या छायाचित्राचा निषेध नोंदवित हिरवी साडी परिधान करून आंदोलन केले.

यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना संगीता तिवारी म्हणाल्या की, महिलांच्या संरक्षणाच्या दृष्टीने संबंधित प्रकरणात कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. कारवाई न झाल्यास भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने योग्य ती कारवाई करावी.

या आंदोलनात शोभना पानीकर, माया वाघमारे, रजनी घोलप यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या. आंदोलनादरम्यान विविध घोषणाबाजी करण्यात आली आणि संबंधित प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

## बँकिंग क्षेत्रातील नाविन्याला चालना देण्यासाठी आयडीबीआय बँकेतर्फे आयडीबीआय इन्नोव्हेशन २०२६ या हॅकेथॉनचे आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** आयडीबीआय बँके तर्फे आज त्यांच्या हॅकेथॉन आयडीबीआय इन्नोव्हेट २०२६ या भविष्याभिमुख दृष्टिकोनाशी संबंधित अशा उपक्रमाची घोषणा केली असून या अंतर्गत बँकिंग पध्दतींमधील नाविन्य वाढून डिजिटल बदलांना चालना देण्यात येणार आहे. या उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन आयडीबीआय बँकेचे एमडी आणि सीईओ श्री. राकेश शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले, यामुळे आता पुढील पिढीतील तंत्रज्ञानाचा वापर बँकिंग क्षेत्रात आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना चालना मिळेल.

‘ बिल्ड, इंटिग्रेट, ट्रान्सफॉर्म’ विषयावर आधारीत या हॅकेथॉन मध्ये संपूर्ण भारतातील स्टार्ट अप्स, फिनटेक्स, डेव्हलपर्स आणि इन्नोव्हेटर्स कडून सहभागी होण्यास निमंत्रण देण्यात येत आहे. या उपक्रमाचे डिझाईन हे कलात्मकता वाढून तंत्रज्ञानातील कौशल्याचा वापर करुन बँकिंग क्षेत्राला भेडसावणार्या जगातील प्रत्यक्ष समस्यांवर उपाय शोधण्यासाठी करण्यात आले आहे.

या प्रसंगी बोलतांना आयडीबीआय बँकेचे एमडी आणि सीईओ श्री राकेश शर्मा यांनी सांगितले :

आयडीबीआय इन्नोव्हेट २०२६’ च्या माध्यमातून, बँकिंग सेवांचे स्वरूप नव्याने घडवण्यासाठी प्रगल्भ बुद्धिमत्ता आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचा संगम घडवून आणणारे प्रभावी उपाय विकसित करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. ही हॅकेथॉन डिजिटल क्षेत्रातील उत्कृष्टतेप्रती आणि ग्राहकाभिमुख नाविन्यपूर्णतेप्रती असलेली आमची वचनबध्दता अधोरेखित करते.

# अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई; ४.२० लाखांचा मुद्देमाल जप्त

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील तनपुरेवाडी शिवारातील गोडसे मळा परिसरात अवैधरित्या वाळू उपसा करून तिची चोरटी वाहतूक करणाऱ्या तिघां विरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत सुमारे ४ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे ११ जून रोजी मध्यरात्रीच्या सुमारास राहुरी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, तनपुरवाडी शिवारातील गोडसे मळा येथे एका टेम्पोमधून अवैधरित्या वाळूची वाहतूक सुरू आहे. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने दोन पंचांसह घटनास्थळी छापा टाकला. यावेळी पोलिसांना एक टाटा ४०७ टेम्पो संशयास्पद अवस्थेत आढळून आला. पोलिसांची चाहूल लागताच वाहनातील काही जण अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. मात्र पाठलाग करून पोलिसांनी विकास राजेंद्र ठोकळे (वय २३, रा. माळी गल्ली, राहुरी) यास ताब्यात घेतले. टेम्पोची पंचांसमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये अंदाजे दोन ब्रास वाळू भरलेली आढळून आली. चौकशी दरम्यान ठोकळे याने टेम्पो चालक काळू गुंजाळ (रा. मुलनमाथा, राहुरी) तसेच वाहन मालक प्रतीक बोबडे (रा. राजवाडा, राहुरी) यांच्या सांगण्यावरून वाळू भरण्याचे काम करीत असल्याची माहिती दिली. दरम्यान, चालक व मालक हे दोघे घटनास्थळावरून फरार झाले. पोलीसांनी अंदाजे ४ लाख रुपयांचा टाटा ४०७ टेम्पो व २० हजार रुपयांची वाळू असा एकूण ४ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल भगवान बाळासाहेब थोरात यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६७६/२०२६ दाखल करण्यात आला असून आरोपीं विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

# झगडेफाटा ते रांजणगाव देशमुख रस्त्याचा प्रस्ताव मंजुर होण्यासाठी पाठपुरावा करावा; आ. आशुतोष काळे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

■ जनप्रवास वार्ताहार

**कोळपेवाडी :** ग्रामीण भागातील दळणवळणाचा दर्जा सुधारणे आणि शेतीसाठी पाण्याचे योग्य नियोजन करणे हीच शाश्वत विकासाची खरी गुरुकिल्ली असल्याने तालुक्यातील अनेक प्रलंबित कामांचे प्रस्ताव शासन दरबारी सादर केले आहे. यातील अतिशय महत्वाचा झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख रस्ताच्या प्रस्ताव विविध योजनेंतर्गत दाखल केला असून हा प्रस्ताव मंजूर करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करावा अशी मागणी आ. आशुतोष काळे यांनी अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे केली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शुक्रवार (दि.१२) रोजी कोपरगाव तालुक्यातील अंजनापूर गावात भेट दिली. यावेळी आ. आशुतोष काळे यांनी त्यांची भेट घेतली असता झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख रस्ता (राज्य मार्ग क्रमांक ६५) रस्त्याचे काम होणे अत्यंत गरजेचे असल्याने या रस्त्याच्या कामाचा प्रस्ताव सीआरएफ, हॅम, एडीबी, एनडीपी, एआयबी कडे दिला असल्याबरोबरच केंद्रीय रस्ते मंत्री ना. नितीन गडकरी यांच्याकडे हा रस्ता राष्ट्रीय महामार्गात घेण्याची मागणी केली आहे. आपण देखील या रस्त्याच्या कामासाठी विविध स्तरावर प्रयत्न करावे. तसेच अंजनापूर बंधारा क्रमांक ३ ते मंगलमूर्ती मंगल कार्यालय पर्यंत तसेच निळवंडे तळेगाव शाखा कालवा टेल ते खोकड विहीर पूर चारी अशा महत्वाच्या कामांचे प्रस्तावांवर शासनाकडे दाखल असून हे प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करण्यासाठी आपण देखील पाठपुरावा करावा. मी सातत्याने हे प्रस्ताव मंजूर होण्यासाठी पाठपुरावा करीत असून या रस्त्याच्या खराब रस्त्याच्या लांबी करिता बजेट



मधून जास्तीतजास्त निधी उपलब्ध होऊन रस्त्याच्या कामाची वर्क ऑर्डर लवकरच प्रसिद्ध होणार असल्याची माहिती यावेळी आ. आशुतोष काळे यांनी दिली आहे.

झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक वाढली असल्याने या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे अत्यंत गरजेचे असून या कामाचा प्रस्ताव सध्या शासन स्तरावर अंतिम मंजुरीच्या टप्प्यात आहे. हि मंजुरी लवकरात लवकर मिळावी. हे दोन्ही प्रस्ताव संपूर्ण परिसराच्या आर्थिक आणि शेतीविषयक प्रगतीला दिशा देणारे आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने देखील या प्रस्तावांना गती देणे अत्यंत गरजेचे असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी जिल्ह्याधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले असता जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी प्रशाकीय पातळीवर प्रस्तावांचा पाठपुरावा करण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, प्रांताधिकारी माणिकराव आहेर, तहसीलदार महेश सावंत, नायब तहसीलदार सौ. प्रफुल्लिता सातपुते, कोपरगाव नगरपरिषद मुख्याधिकारी सुहास जगताप, कृषी अधिकारी मनोज सोनवणे, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता डी. डी. पाटील, कोपरगाव ग्रामीणचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी, शिर्डीचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे, सरपंच सौ. कविता गव्हाणे यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नगराध्यक्ष म्हणतात ढापे टाकले; नगरपालिकेला माहिती नाही कुठे टाकले : वाल्मिक लहिरे

■ जनप्रवास वार्ताहार

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहरात गेल्या शंभर दिवसांत केलेल्या विकासकामांचा पाढा वाचताना नगराध्यक्ष पराग संधान यांनी पत्रकार परिषदेत शहरात गटारींवर ७२६ ढापे टाकल्याचा दावा केला होता. मात्र शहरात कुठे आणि किती ढापे टाकले याची अधिकृत माहिती नगरपालिकेकडे उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. नगराध्यक्ष म्हणतात ढापे टाकले पण नगरपालिकेला माहितीच नाही कि कुठे टाकले असा भोंगळ कारभार पालिकेत सुरु असल्याचे राष्ट्रवादी पक्षाचे नगरसेवक वाल्मिक लहिरे यांनी गुरुवार (दि.११) रोजी गौतम बँक कोपरगाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी पक्षाचे नगरसेवक बाळासाहेब रुईकर, इम्तियाज अत्तर, मंदार पहाडे उपस्थित होते.

नगराध्यक्ष पराग संधान यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन शहरात गटारींवर ७२६ ढापे टाकल्याचा दावा केला होता. या दाव्याची सत्यता पडताळण्यासाठी राष्ट्रवादी पक्षाच्या गटनेत्या गौरी पहाडे यांनी नगरपालिकेकडे लेखी निवेदन सादर करत शहरात नेमके कुठे आणि किती ढापे टाकले



याची अधिकृत माहिती मागितली होती. मात्र आश्चर्यकारक बाब म्हणजे पालिका प्रशासनाकडे याबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याचे लेखी उत्तर नगरपालिकेने दिले आहे. या प्रकारामुळे सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नगराध्यक्ष नेमकी कुणाची फसवणूक करीत आहे.

सत्तेच्या या पहिल्या शंभर दिवसांत केवळ आणि केवळ नागरिकांचा विश्वासघात करण्याचे काम सत्ताधाऱ्यांनी केले आहे. शहरात विकासाचे काम तर लांबच राहिले उलट कोपरगावकरांना अशुद्ध आणि गाळमिश्रित पाणी पाजण्याचे पाप या सत्ताधाऱ्यांनी केले आहे. पाण्याचा प्रश्न असो शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न असो किंवा रस्त्यांवरील पथदिव्यांचा प्रश्न अशा सर्वच प्रश्नांमध्ये सत्ताधारी पूर्णपणे अपयशी ठरले आहे. केवळ सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर करून नागरिकांना खोटी माहिती द्यायची आणि आपली पाठ थोपटून घेण्याचा केविलवाणा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून सुरू असल्याने कोपरगावच्या नागरिकांचा मोठा भ्रमनिरास झाला आहे.

सत्ताधारी आमदार आशुतोष काळे यांनी मंजूर करून आणलेल्या विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण करण्याचे काम हे करत होते आणि आता स्वतः च्या कामांचे खोटे दावे करून नागरिकांची फसवणूक करत आहेत अशी टीका राष्ट्रवादीचे नगरसेवक इम्तियाज अत्तर त्यांनी केली आहे.

## अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलात मोठे फेरबदल; १९ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील १९ पोलीस निरीक्षक व सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या व नव्या नेमणुका जाहीर करण्यात आल्या आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार प्रशासकीय गरज, कायदा व सुव्यवस्था तसेच अधिकाऱ्यांच्या विनंतीनुसार या बदल्या करण्यात आल्या आहेत.

बदल्यांमध्ये तोफखाना, राहुरी, कोतवाली, पाथर्डी, श्रीगोंदा, नेवासा, राहाता, कर्जत, पारनेर, भिंगार कॅम्प, एमआयडीसी पोलीस ठाणे, श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे यांसह विविध शाखांतील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तसेच नियंत्रण कक्ष, मानव संसाधन विभाग, आर्थिक गुन्हे शाखा, एएचटीयू, शहर वाहतूक शाखा, दक्षिण विभागीय पथक अशा महत्त्वाच्या विभागांमध्येही नवीन नेमणुका करण्यात आल्या आहेत. तसेच आर्थिक गुन्हे शाखा, भिंगार कॅम्प, एमआयडीसी आणि पारनेर पोलीस ठाण्यांमध्येही सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालयाने सर्व संबंधित अधिकाऱ्यांना पदग्रहण अवधी न घेता तत्काळ नव्या ठिकाणी हजर होण्याचे निर्देश दिले आहेत. कार्यभार स्वीकारल्याचा अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. आदेशाचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# अल निनोचा धोका ओळखा; पुरेसा पाऊस पडल्यावरच करा पेरणी : मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप यांचे आवाहन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**यवत :** शाश्वत विकास आणि जमिनीचे आरोग्य जपण्याच्या उद्देशाने खामगाव (ता– दौंड) येथे विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तालुका कृषी अधिकारी अजिंक्य दुधाने यांच्या मार्गदर्शनाखाली विविध मोहिमांचे आयोजन करण्यात येत आहे, त्या अनुषंगाने आयोजित

कार्यक्रमात हवामान बदलावर मार्गदर्शन करताना मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप यांनी शेतकऱ्यांना अत्यंत महत्त्वाचा सल्ला दिला. ते म्हणाले, “सध्या ‘अल निनो’चा प्रभाव जाणवत आहे. यामुळे पावसाच्या वितरणात अनिश्चितता राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ ढगाळ वातावरण पाहून घाईने पेरणी करू नका. जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण होईल इतका समाधानकारक पाऊस पडल्यानंतरच शेतकऱ्यांनी पेरणीचे धाडस करावे, जेणेकरून दुबार पेरणीचे संकट टाळता येईल.”

यावेळी सतीश जगताप यांनी जमिनीचा पोत सुधारण्यासाठी रासायनिक खतांचा अतिवापर थांबवून



सेंद्रिय कर्ब वाढवण्यावर भर दिला.

या कार्यक्रमात उपकृषी अधिकारी संतोष मोरे यांनी जैविक खतांचा संतुलित वापर करण्याविषयी मार्गदर्शन केले. सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी ‘महाविस्तार AI App आणि ‘महाडिबीटी पोर्टल’वरील शासकीय योजनांची सविस्तर माहिती देऊन शेतकऱ्यांना डिजिटल साधनांचा लाभ घेण्यास प्रोत्साहित केले. कार्यक्रमात हुमणी अळीचे नियंत्रण आणि प्रकाश सापळ्यांचा वापर या तांत्रिक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शेती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या स्थानिक प्रयोगशील शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये शांताराम दादा नागवडे, बापूसाहेब थोरात, अजित नागवडे, तुषार शेळके, आबासाहेब शंकर नागवडे, विनोद जगताप, बबन तांबे, आतेश खेडेकर आणि स्वप्निल नागवडे यांचा समावेश होता. याप्रसंगी बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते, तर आभार प्रदर्शन सहाय्यक कृषी अधिकारी पंढरीनाथ कुतवळ यांनी केले.

## संक्षीप्त वृत्त

### एथर एनर्जीकडून स्कूटरसाठी आवाजाधारित व्हॉईस ऑन एथर संवाद सुविधा सादर

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**पुणे :** एथर एनर्जी ने आपल्या जेन ३ आणि त्यापुढील स्कूटर्ससाठी 'व्हॉईस ऑन एथर' ही नवी आवाजाधारित सुविधा सादर केली आहे. दूरस्थ पद्धतीने दिल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअर अद्ययावत सुविधेद्वारे ही सेवा ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे हजारो विद्यमान ग्राहकांना स्कूटरशी थेट आवाजातून संवाद साधण्याची सुविधा मिळणार आहे.

कंपनीचे सहसंस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी तरुण मेहता यांनी समाजमाध्यम 'एक्स'वर या सुविधेची घोषणा केली. भविष्यात वाहन चालविताना चालकांना पडद्याकडे वारंवार पाहण्याची आवश्यकता उरणार नसल्याचे त्यांनी नमूद केले. कनेक्टेड तंत्रज्ञानावर सातत्याने भर देणाऱ्या एथरने यापूर्वी स्पर्शाधारित डिजिटल दर्शकफलक असलेली विद्युत स्कूटर बाजारात आणली होती. आता आवाजाधारित सुविधेमुळे वाहनाशी संवाद अधिक सुलभ आणि सुरक्षित करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे.

### 'तू ही रे दिल में' मधील संजयची भूमिका साकारण्याच्या अनुभवाने त्याला खूप काही शिकायला मिळाले

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**पुणे :** झी टीव्ही वाहिनी ही नेहमीच देशभरातील प्रेक्षकांच्या मनाला भिडणाऱ्या भावनिक आणि हृदयस्पर्शी कथा सादर करण्यासाठी ओळखली जाते. 'गंगा माई की बेटियाँ', 'वसुधा' आणि 'तुम से तुम तक' ह्या तीनही मालिका टीआरपी चार्टमध्ये टॉप ५ मध्ये स्थान मिळवत प्रेक्षकांची मने जिंकत आहेत. आता लवकरच 'तू ही रे दिल में' या नवीन मालिकेद्वारे प्रेक्षकांना पुन्हा एकदा आकर्षित करण्यासाठी वाहिनी सज्ज झाली आहे. १५ जूनपासून प्रसारित होणाऱ्या या मालिकेत अब्रार काझी (संजय), प्रियांशी यादव (वृंदा) आणि सिमरन रावल (स्वाती) मुख्य भूमिकांमध्ये दिसणार आहेत.

प्रेमकथेबरोबरच 'तू ही रे दिल में' ही नियती, नाती आणि आयुष्य बदलणाऱ्या निर्णयांची भावनिक कहाणी आहे. ही कथा आहे वृंदा या तरुणीची, जिचा श्रद्धा आणि नियतीवर ठाम विश्वास आहे. मात्र परिस्थिती तिच्या आयुष्यात असा वळण आणते की तिच्या विश्वासासमोर मोठे आव्हान उभे राहते. वृंदा, संजय आणि स्वाती यांच्या आयुष्याचा प्रवास एकमेकांशी गुंफला जातो आणि त्यातून प्रेम, त्याग, हृदयभंग आणि कठीण निर्णयांनी भरलेली, भावनिक खोली असलेली आणि प्रेक्षकांना जवळची वाटणारी प्रभावी कथा उलगडत जाते. अब्रार काझी या मालिकेत संजयची मुख्य भूमिका साकारताना दिसणार आहे. त्याने आपल्या व्यक्तिरेखेबद्दल आणि ही भूमिका त्याच्यासाठी खास का आहे याबद्दल मनमोकळेपणाने संवाद साधला.

### संजय कपूर, शाहीर आणि मौनी रॉय यांची प्रमुख भूमिका असलेली ॲमेझॉन एमएक्स प्लेअरची 'अब होगा हिसाब' ही सूडकथेवर आधारित सीरिज १८ जूनपासून

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**पुणे :** भारतातील आघाडीची मोफत, प्रीमियम आणि जाहिरात-आधारित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने आपल्या बहुप्रतीक्षित 'अब होगा हिसाब' या ओरिजिनल सूडकथेवर आधारित सारिजचा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. पंजाबच्या पार्श्वभूमीवर घडणारी ही सीरिज बॉबी आणि बंटी मनोचा या दोन भावांच्या आयुष्याभोवती फिरते. एका घटनेमुळे त्यांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडतो. आपल्या माणसांसाठी तुम्ही कोणती पातळी गाठू शकता? हा या सीरिजमधील मध्यवर्ती प्रश्न आहे. आरे स्टुडिओची निर्मिती असलेल्या या सीरिजमध्ये संजय कपूर आणि शाहीर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. त्यांच्यासोबत मौनी रॉय, अविनाश मिश्रा, निमृत कौर अहलुवालिया, हरमन सिंघा आणि आशीमा वर्दान हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेमध्ये झळकणार आहेत. 'अब होगा हिसाब' ही सीरिज १८ जूनपासून ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर मोफत स्ट्रीम होणार आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचे कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, 'अब होगा हिसाब' ही भावांमधील नाते, सूड आणि त्यामधील गुंतागुंतीच्या भावनांची प्रभावी कथा आहे. संजय कपूर, शाहीर, मौनी रॉय, अविनाश मिश्रा आणि इतर अनेक प्रतिभावान कलाकारांच्या दमदार अभिनयामुळे ही सीरिज अधिक प्रभावी झाली आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरमध्ये आम्ही भारताच्या मातीत रुजलेल्या आणि देशभरातील प्रेक्षकांशी जोडल्या जाणाऱ्या कथा मोफत स्वरूपात सादर करण्यासाठी कटिबद्ध आहोत. 'अब होगा हिसाब' ही त्याच वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. वास्तवदर्शी कथनशैली आणि सर्वांना भावणाऱ्या विषयांची सांगड या सीरिजमध्ये घालण्यात आली आहे. या सारिजचा ट्रेलर सादर करताना आम्हाला आनंद होत असून, प्रेक्षकांनी या रोमांचक प्रवासाचा अनुभव घ्यावा, अशी आमची इच्छा आहे.

### इनब्रू बेव्हरेजेसने व्हाईट मिसचीफ व्होडकाच्या नव्या आणि प्रीमियम अवताराचे अनावरण केले

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**पुणे :** भारतातील सर्वाधिक लोकप्रिय व्होडका ब्रँड्सपैकी एक असलेल्या व्हाईट मिसचीफ व्होडकाने आपल्या मुख्य पोर्टफोलिओमध्ये व्यापक ब्रँड रिवॅम्प आणि प्रीमियमायझेशनची घोषणा केली आहे. हा बदल ब्रँडच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा असून, अधिक दर्जेदार पण सहज आणि आनंददायी ड्रिंकिंग अनुभव शोधणाऱ्या नव्या पिढीच्या ग्राहकांसाठी ब्रँडची नव्याने मांडणी करण्यात आली आहे. या नव्या पोर्टफोलिओमध्ये आकर्षक आणि आधुनिक पॅकेजिंग डिझाइन, अधिक प्रभावी व्हिज्युअल ओळख आणि अधिक स्मूथ व आधुनिक व्होडका अनुभव देण्यासाठी विकसित केलेले सुधारित लिक्विड प्रोफाइल समाविष्ट आहे. ब्रँडची युवा आणि उत्साही ओळख कायम ठेवत, नव्या व्हाईट मिसचीफ व्होडकाला अधिक प्रीमियम आणि आधुनिक रूप देण्यात आले आहे, जे बदलत्या ग्राहकांच्या पसंतीशी सुसंगत आहे. या बदलाबद्दल बोलताना इनब्रू बेव्हरेजेसचे जनरल मॅनेजर – मार्केटिंग, श्री. सुमित तिवारी म्हणाले, ही प्रीमियमायझेशन मोहीम आमच्या व्यापक धोरणाचा एक भाग आहे. यामागील उद्दिष्ट म्हणजे आमचा पोर्टफोलिओ अधिक मजबूत करणे आणि भारतातील युवा प्रौढ ग्राहकांमध्ये आधुनिक व उच्च दर्जाच्या व्होडकासाठी वाढणारी मागणी पूर्ण करणे. व्हाईट मिसचीफला भारतीय व्होडका बाजारात नेहमीच मजबूत ग्राहक ओळख आणि सांस्कृतिक महत्त्व लाभले आहे. या रिवॅम्पद्वारे आम्ही आजच्या ग्राहकांसाठी ब्रँडची नव्याने कल्पना करत आहोत.

# पनीर की अनालॉग चीज? ग्राहकांना खरी माहिती मिळावी; आमदार विक्रमसिंह पाचपुते यांची ठाम भूमिका

## ग्राहकांची दिशाभूल थांबविण्याचा आग्रह

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** अन्नपदार्थांमधील भेसळ, ग्राहकांची दिशाभूल आणि अन्नसुरक्षेच्या मुद्द्यांवर चर्चा होत असताना श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी पनीर आणि अनालॉग चीज यातील फरक अधोरेखित करत ग्राहकांना योग्य माहिती मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले.

आमदार पाचपुते यांनी सांगितले की, पनीर आणि अनालॉग चीज हे दोन्ही भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या नियमांनुसार तयार होणारे कायदेशीर खाद्यपदार्थ आहेत. त्यामुळे अनालॉग चीज बेकायदेशीर नसले तरी त्याची विक्री करताना ग्राहकांना स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे. अनालॉग चीजमध्ये दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पतीजन्य तेलांचा वापर केला जातो, तर पनीर हे थेट दुधापासून तयार केले जाते. त्यामुळे या दोन्ही पदार्थांमध्ये मूलभूत फरक असल्याचे त्यांनी सांगितले.

बाजारपेठेत अनेक ठिकाणी ग्राहकांना पनीर किंवा अस्सल चीज म्हणून अनालॉग चीज दिले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. ही ग्राहकांची दिशाभूल असून त्यांनी नेमका कोणता पदार्थ खरेदी केला किंवा सेवन केला याची स्पष्ट माहिती मिळाली पाहिजे, असे पाचपुते यांनी नमूद केले.



खाद्यपदार्थांतील भेसळीच्या विषयावर बोलताना त्यांनी यापूर्वी विधानसभेतही हा मुद्दा उपस्थित केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संबंधित मंत्री, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर हा तांत्रिक आणि महत्त्वाचा विषय मांडल्यानंतर त्याचे गांभीर्याने परीक्षण करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

ग्राहकांची दिशाभूल टाळण्यासाठी हॉटेलमधील पदार्थ सूची तसेच वेष्टनबंद खाद्यपदार्थांवर संबंधित पदार्थ पनीर आहे की अनालॉग चीज याचा स्पष्ट उल्लेख असावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. तसेच पनीरच्या नावाखाली अनालॉग चीज विकून ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्यांवर आणि भ्रामक जाहिरातींवर नियंत्रण आणण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आमदार पाचपुते यांच्या या भूमिकेमुळे अन्नपदार्थांच्या विक्रीत अधिक पारदर्शकता येण्यास मदत होणार असून ग्राहकांना ते कोणता पदार्थ सेवन करत आहेत याची अचूक माहिती मिळण्यास हातभार लागणार आहे. नफ्याच्या हव्यासापोटी ग्राहकांना अंधारात ठेवण्याऐवजी प्रामाणिक माहिती देणे हीच खरी ग्राहकसेवा असल्याचा संदेश त्यांनी यावेळी दिला.

# १४ वर्षीय मुलीवर अत्याचार करुन जीवे मारण्याची धमकी

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**राहाता :** शहरातील एका १४ वर्षीय मुलीवर त्याच गल्लीतील राहणारा हरदास गायकवाड यांनी दि.६ जून रोजी मुलीवर अत्याचार केल्याची घटना घडली. तिला जीवे मारण्याची धमकी दिली होती. सदर मुलीने घडलेले घटना आपल्या घरच्यांना सांगितली यानंतर राहाता पोलीस स्टेशनमध्ये सदर आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीला अटक केली असून त्याला ४ दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



या दरम्यान अत्याचार ग्रस्त मुलीला राहाता पोलीस स्टेशनच्या तपासी महिला अधिकारी कोमल कुमावत यांनी राहाता पोलीस स्टेशनमध्ये मुलीला बोलावून घेत चौकशीच्या नावाखाली उलट सुलट प्रश्न विचारून भीती दाखवत असल्याचा धक्कादायक प्रकार पीडित मुलीने त्याने सांगितला. याविषयी मुलीने घडलेली हकीकत माजी नगरसेविका संगीता टाक यांना सांगितले त्यानंतर संतप्त नातेवाईक,स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांनी या विरोधात पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला. पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक सरोदे यांच्या कडे घडलेली हकीकत सांगितली. संबंधित महिला तपासी अधिकारी कोमल कुमावत यांच्याकडून सदर घटनेचा तपास काढून घ्यावा.तसेच त्यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई करावी. सक्षम पोलीस अधिकाऱ्याकडे तपास द्यावा अशी मागणी ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी केली.संबंधित महिला अधिकारी आरोपीला मदत करत आहे.का असा संशय नागरिकांनी व्यक्त केला. तर आरोपीची नीच प्रवृत्तीचा असून या नराधमाची गावातून दिंड काढावी अशी मागणी देखील संतप्त ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधी यांनी केली.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाच्याच्या कारवाईत एकूण १ कोटीहून अधिक रुपयाचा मुद्देमाल जप्त : अतुल कानडे

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** राज्य उत्पादन शुल्कच्यावतीने करण्यात आलेल्या कारवाईत अंदाजे १ कोटी २० लाख ९६ हजार रुपये किंमतीचा मद्यसाठा, १५ लाख रुपये किंमतीचे वाहन तसेच इतर साहित्य असा एकूण १ कोटी ३५ हजार ९९ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक अतुल कानडे यांनी दिली आहे. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सह-आयुक्त, अंमलबजावणी व दक्षता . प्रसाद सुर्वे तसेच पुणे विभागीय उप आयुक्त सागर धोमकर यांच्या आदेशानुसार गुणात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. यामध्ये निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क , सी यांनी केलेल्या कारवाईत पुणे-मुंबई महामार्गावरील हवेली तालुक्यातील सुतारवाडी पाषाण एका कंटेनर वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये गोवा राज्यातील विदेशी मद्याचे १ हजार २०० बॉक्स गोवा राज्यात निर्मित झालेली परंतु मध्य प्रदेश राज्यात निर्मित व विक्री असलेल्या बनावट लेबलांचा वापर करून "Royal Select Deluxe Whisky" या बँडचे विदेशी मद्य आढळून आले.

# शासकीय शेतपानंद रस्त्यांवरील अतिक्रमणाविरोधात कठोर कारवाईचा इशारा

## पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या १० ते ५० फूट रुंदीच्या रस्त्यांचे संरक्षण; ४० रस्त्यांसाठी शासनाचा मोठा निधी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शासनाच्या नकाशात नोंद असलेल्या शेतपानंद रस्त्यांवर झालेली अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नसून अतिक्रमण काढून रस्ते खुले केल्यानंतर पुन्हा अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी दिला. शेतकऱ्यांच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले हे रस्ते पूर्वीपासूनच १० फूट ते ५० फूट रुंदीचे असून त्यांचे मूळ स्वरूप कायम राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शुक्रवारी (दि. १२) श्रीगोंदा तहसील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी विनीत शिर्के, तहसीलदार सचिन डोंगरे आणि मुख्याधिकारी पुष्पा गंध-भगत उपस्थित होत्या.

आमदार पाचपुते म्हणाले की, शासनाच्या अधिकृत नकाशामध्ये नमूद असलेले शेतपानंद रस्ते अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहेत. मात्र कालांतराने काही ठिकाणी या रस्त्यांवर अतिक्रमणे झाल्यामुळे त्यांची रुंदी कमी झाली, तर काही रस्ते पूर्णपणे बंद झाल्याची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक, कृषी यंत्रसामग्रीची ने-आण आणि दैनंदिन शेतीकामांसाठी मोठ्या



अडचणींचा सामना करावा लागत होता.

तालुक्यात शेतपानंद रस्ते मुक्त करण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेला शेतकरी, ग्रामस्थ, ग्रामस्तरीय समित्या आणि प्रशासन यांचे चांगले सहकार्य लाभत असल्याचे त्यांनी सांगितले. आतापर्यंत १३० प्रस्तावित रस्त्यांपैकी ४० रस्ते खुले करण्यात आले असून सुमारे ५४ किलोमीटर लांबीचे रस्ते अतिक्रमणमुक्त झाले आहेत. या कामगिरीमुळे शेतपानंद रस्ते खुलीकरण मोहिमेत श्रीगोंदा तालुका जिल्ह्यात अव्वल स्थानावर पोहोचला असल्याचे त्यांनी नमूद केले.

खुले करण्यात आलेल्या रस्त्यांच्या विकासासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीतून रस्त्यांचे मजबुतीकरण, सुधारणा आणि शेतकऱ्यांना वर्षभर वापरता येईल अशी सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

रस्त्यांच्या हद्दीच्या खुणा काढून टाकणे, रस्ता बुजविणे, अतिक्रमण करून पुन्हा ताबा मिळविण्याचा प्रयत्न करणे किंवा शासकीय रस्ता खासगी मालमत्तेत समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणे हा गंभीर स्वरूपाचा कायद्याचा भंग मानला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये संबंधितांविरुद्ध महसूल आणि अन्य कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

शेतपानंद रस्ते कायमस्वरूपी खुले राहावेत आणि भविष्यात कोणतेही वाद निर्माण होऊ नयेत यासाठी शेतकऱ्यांनी कायद्याचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. उर्वरित रस्तेही लवकरच सामंजस्यातून खुले करण्यात येतील आणि श्रीगोंदा तालुका राज्यातील आदर्श शेतपानंद रस्ता अभियान म्हणून ओळखला जाईल, असा विश्वास आमदार पाचपुते यांनी व्यक्त केला.

# सराईत गुन्हेगारांविरोधात तडीपारीचा प्रस्ताव; श्रीगोंदा पोलिसांचा गुन्हेगारीवर वचक निर्माण करण्याचा निर्धार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली असून, विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये वारंवार सहभागी असलेल्या चार सराईत गुन्हेगारांविरुद्ध तडीपारीची कारवाई करण्याचा प्रस्ताव प्रांताधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संजय ढेंगे यांनी दिली.

तडीपारीचा प्रस्ताव पाठविण्यात आलेल्यांमध्ये लोणी येथील बाळासाहेब नाहटा, श्रीगोंदा येथील परेश जाधव, घोगरगाव येथील सागर बोरुडे आणि मांडवगण येथील विजय खेंडके यांचा समावेश आहे. संबंधित व्यक्तींविरुद्ध विविध प्रकारचे गुन्हे दाखल असून, त्यांच्या हालचालींमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन ही कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. शुक्रवारी श्रीगोंदा पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना पोलीस निरीक्षक संजय ढेंगे यांनी गुन्हेगारीविरोधात कठोर भूमिका जाहीर केली. तालुक्यात शांतता, सुव्यवस्था आणि नागरिकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध प्रभावी



व कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना ढेंगे म्हणाले, सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही पोलिसांची प्राथमिक जबाबदारी आहे. कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी कोणत्याही दबावाला बळी न पडता गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाईल. गुन्हेगारांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही. श्रीगोंदा तालुक्यात अलीकडील काळात घडलेल्या विविध गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी घेतलेल्या या आक्रमक भूमिकेचे नागरिकांकडून स्वागत होत आहे. दरम्यान, चार सराईत गुन्हेगारांविरुद्ध तडीपारीचा प्रस्ताव पाठविण्यात आल्याने गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये खळबळ उडाली असून, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासन अधिक सक्रिय झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

# स्टेनोग्राफर पद राज्यसरकारने रद्द करू नये : सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** येणाऱ्या १३ तारखेच्या कॅबिनेट मिटिंग मध्ये राज्य सरकार स्टेनोग्राफर पद रद्द करण्याच्या विचारात असल्याचे बातम्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, जर तसे झाले तर अनेक विद्यार्थ्यांवर अन्याय होईल या करिता स्टेनोग्राफर पद रद्द करू नये अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी केली आहे.

राज्य सरकारचा हा निर्णय अनेक स्टेनोग्राफर शिक्षण झालेल्या विद्यार्थ्यांवर अन्याय होणारा व त्यांचे भविष्य अंधारमय होणारा आहे. जर राज्यसरकारला हा निर्णय घ्यायचाच असेल तर अगोदर त्यांनी या शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची व्यवस्था करणे गरजेचे आहे, तसेच ज्या संस्था स्टेनोग्राफी चे शिक्षण देतात त्यांच्याही रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे, जर असे झाले तर अनेक कुटुंबावर उपासमारीची वेळ येऊ शकते व अनेक विद्यार्थी ज्यांनी स्टेनोग्राफी चे शिक्षण घेतले आहे व जे घेत आहेत त्यांच्यावर अन्याय होणार ते बेरोजगार होतील. अशा परिस्थिती मध्ये राज्यसरकारने असा कोणताही निर्णय स्टेनोग्राफी पद रद्द करण्याचा घेऊ नये अथवा स्टेनोग्राफी शिक्षण देणाऱ्या संस्था व स्टेनोग्राफी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची रोजगारा बाबत तजबीज करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी केली आहे.

# प्रभाग क्रमांक १२ च्या विकास कामांना गती देणार : नगरसेवक विकी जगताप

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रभाग क्रमांक १२ मध्ये विविध विकासकामांना वेग देण्यात येत आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांना कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून आशा टॉकीज चौक, श्रीपाद ग्रंथ भंडार ते हौसिंग हॉस्पिटल या मार्गावरील बंद पाईप गटार व रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ उत्साहात संपन्न झाला.

यावेळी बोलताना नगरसेवक विकी जगताप म्हणाले की, प्रभाग क्रमांक १२ हा जुन्या गावठाण भागातील असून या भागातील अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहिले आहेत. त्यामुळे नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे न झाल्यामुळे काही भागांमध्ये दूषित पाणीपुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाला असून त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. आता हे प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून



विकासकामांना गती दिली जाणार आहे. प्रभागातील नागरिकांना विश्वासात घेऊन टप्प्याटप्प्याने सर्व विकासकामे मार्गी लावली जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

मनपा प्रभाग क्रमांक १२ मध्ये आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून आशा टॉकीज चौक, श्रीपाद ग्रंथ भंडार ते हौसिंग हॉस्पिटलपर्यंतच्या बंद पाईप गटार व रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ नगरसेवक विकी जगताप यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी माजी नगरसेवक प्रा. माणिकराव विधाते, संतोष गेन्नाप्पा, संग्राम रासकर, वाल्मीक कुलकर्णी, दिनेश लोंढे, ॲड. सुभाष काकडे, पुष्कर कुलकर्णी, अमोल निस्ताने, कमलेश भंडारी, डॉ. अभिजीत हौसिंग, गंगानाथ सोनवणे, किशोर देशमुख, सतीश वैद्य, भैया घुले, चेतन सादुल, अंबादास सोनवणे, मोहित गांधी, विशाल थोरात यांच्यासह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकार मंत्र्यांचे आदेश 'लज्जास्पद'; उच्च न्यायालयाचे कडक ताशेरे

## प्रशासनाची टोलवाटोलवी आता चालणार नाही : निवडणुकांसाठी सक्त आदेश

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**पाटस :** भीमा पाटस साखर कारखान्याच्या प्रशासकीय समिती व निवडणूक प्रक्रियेवरून सुरू असलेल्या वादात अखेर उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करत सहकार मंत्र्यांच्या कारभारावर गंभीर ताशेरे ओढले आहेत. ७ मे २०२६ रोजी सहकार मंत्र्यांनी दिलेला आदेश केवळ 'अस्पष्ट' नसून तो 'अशोभनीय' असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने मंत्र्यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

याचिकाकर्ते वसंत साळुंखे यांनी सहकार मंत्र्यांच्या २४ व २९ एप्रिलच्या अंतरिम आदेशांना उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र, त्यानंतर ७ मे रोजी मंत्र्यांनी अंतिम आदेश काढत प्रशासकीय समितीच रद्द केली.

यावर सुनावणी सुरू असताना, प्रतिवादींच्या वकिलांनी याचिकाकर्त्यांच्या अधिकार क्षेत्रावर आक्षेप घेतला. मात्र, न्यायालयाने हा आक्षेप 'हास्यास्पद' असल्याचे सांगत फेटाळून लावला. "याचिकाकर्त्यांना प्रशासकीय समितीवर काम करण्याचा कायदेशीर दर्जा प्राप्त होता, त्यामुळे त्यांना आदेशाला आव्हान देण्याचा पूर्ण अधिकार आहे," असे खडसावून सांगत न्यायालयाने मंत्र्यांच्या निर्णयातील त्रुटी चव्हाट्यावर आणल्या.

मंत्र्यांनी आदेश काढताना याचिकाकर्ते वसंत साळुंखे हे 'तक्रारदार होते' म्हणून त्यांना प्रशासकीय समितीवर राहण्यास अपात्र ठरवले. मात्र, याचिकाकर्त्यांचे ज्येष्ठ वकील संजीव पी. कदम यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, केवळ तक्रार केली म्हणून कोणी अपात्र ठरत नाही. यावर टिप्पणी करताना न्यायालयाने म्हटले की, "मंत्र्यांनी कोणतीही पात्रता न तपासता आणि ठोस निष्कर्ष न काढता परस्पर आदेश काढले आहेत. मंत्र्यांनी आपल्या अधिकारांचा ज्या पद्धतीने वापर केला, तो अत्यंत लज्जास्पद आहे."

**न्यायालयाने दिलेले महत्त्वाचे निर्देश**

- प्रशासक नियुक्ती: प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी १२ जूनपर्यंत निवडणूक घेण्यासाठी विशेष लेखापरीक्षकाची प्रशासक म्हणून नेमणूक करावी.
- निवडणूक निधी: लीजधारक मे. साई प्रिया शुगर प्रा. लि. (जमखंडी) यांनी ४०,११,४७५ रुपये १७ जूनपर्यंत जमा करावेत.
- मतदार यादी: प्रभारी व्यवस्थापकीय संचालकांनी १६ जूनपर्यंत अद्यावत मतदार यादी सादर करावी.
- प्रक्रिया सुरू: नियुक्त प्रशासकाने १९ जूनपर्यंत निवडणूक प्रक्रिया तातडीने सुरू करावी.

निवडणूक घेण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत. १२ मे रोजी नियुक्ती झालेल्या प्रशासकाने दुसऱ्याच दिवशी काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने संतापलेल्या न्यायालयाने, "निवडणुकीची जबाबदारी टाळणाऱ्या अधिकाऱ्यांच्या वर्तनाचे आम्ही समर्थन करत नाही," असे स्पष्ट केले.

उच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दात निर्देश दिल्याने आता




भीमा पाटसच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. याचिकाकर्ते वसंत साळुंखे यांनी उपस्थित केलेला 'जाणूनबुजून विलंब' करण्याचा संशय न्यायालयाने फेटाळलेला नाही, हे महत्त्वाचे आहे. या सर्व आदेशांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आता २२ जून २०२६ रोजी पुढील सुनावणी होणार आहे. जर निवडणुकीच्या प्रक्रियेत पुन्हा ढिलाई किंवा अडथळे आणले गेले, तर संबंधित अधिकाऱ्यांवर आणि जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाईचा बडगा उगारला जाण्याची शक्यता आहे.

साखर कारखान्याच्या राजकारणात आता न्यायालयाच्या या 'आक्रमक' पावित्र्यामुळे भ्रष्ट प्रवृत्तींचे धाबे दणाणले आहेत.

# ग्रीनसीटी प्रकल्पासाठी सकल माळी समाज सरसावला

## उपमहापौर जाधव यांच्या संकल्पनेतून ग्रीनसीटी प्रोजेक्ट ठरणार आदर्श : रामदास फुले

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर ग्रीन सिटी मोहिमेचे पुरस्कर्ते उपमहापौर धनंजय जाधव यांनी नगर शहराच्या पर्यावरण चळवळीला मोठे बळ दिले आहे.कोरोना काळापासून ऑक्सिजनची कमी जाणविल्याने अनेकांना अडचणींना सामोरे जावे लागले. "झाडे लावा झाडे जगवा"या संकल्पनेतून नगर शहराच्या विकासाला मोठी चालना उपमहापौर धनंजय जाधव यांनी दिली आहे.ग्रीन सिटी या मोहिमेमुळे नगर शहराचे पर्यावरणाचे रक्षण व



संवर्धन होईलच तसेच नगर शहराचे नंदनवन लवकरच होईल.

या ग्रीन सिटी मोहिमेसाठी सकल माळी समाज सरसावला आहे.उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून साकारणारे ग्रीनसीटी प्रोजेक्ट ठरणार आदर्श पर्यावरण प्रकल्प असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे नेप्ती विभाग प्रमुख रामदास फुले यांनी केले आहे.

उपमहापौर धनंजय जाधव यांचा सकल माळी समाजाच्या वतीने सत्कार करून सन्मान करण्यात आला . तसेच शहरात राबवणारे ग्रीन सिटी प्रोजेक्ट ला सकल माळी समाजाने पाठिंबा दिला आहे. यावेळी सकल माळी समाजाच्या वतीने विविध वृक्षाचे वाटप नागरिकांमध्ये करण्यात आले. याप्रसंगी सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,विश्वस्त विनोद पुंड, राजेंद्र पडोळे,नेप्ती विभाग प्रमुख रामदास फुले,कोरकमिटी सदस्य अनिल इवळे,अमोल भांबरकर,चंद्रकांत पुंड,कॅप्टन सुधीर पुंड,सुरेश कावळे, रमेश चिपाडे,डॉ.दामोदर कळमकर, रोहित पठारे, गणेश कोल्हे आदी उपस्थित होते.

# जागतिक दृष्टीदान दिनानिमित्त नागरदेवळे येथे फिनिक्सची मोफत नेत्र तपासणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नागरदेवळे (ता. नगर) येथे जागतिक दृष्टीदान दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला ज्येष्ठ नागरिकांसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करतानाच नागरिकांच्या विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. विशेष म्हणजे, मागील




३५ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या या सामाजिक उपक्रमातून आतापर्यंत तब्बल ३ लाख ९७ हजार ४४७ रुग्णांवर मोफत नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आल्या असून हजारो कुटुंबांच्या जीवनात नव्या आशेचा प्रकाश निर्माण करण्यात आला.

नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात आयोजित शिबिराचे उद्घाटन आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी युवा नेते संदिप कर्डिले, महेश झोडगे, दत्ता तापकिरे, फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, माजी सरपंच राम पानमळकर, उपसरपंच सोनू भुजबळ, ग्रामपंचायत सदस्य मयुर पाखरे, ग्रामविस्तार अधिकारी नेताजी भाबड, कामगार तलाठी आदिनाथ निकम, डॉ. विशाल घंगाळे, राजेंद्र बोरुडे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# श्रीरामपूर विभागाचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या नेतृत्वाखालील कारवाईला मोठे यश; अवैध गर्भलिंग निदान रॅकेटमधील आणखी एक सोनोग्राफी मशीन जप्त

■ जनप्रवास प्रतिनिधी

**माळवाडगांव :** श्रीरामपूर विभागाचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या अवैध गर्भलिंग निदानविरोधी विशेष मोहिमेला आणखी एक मोठे यश मिळाले आहे. राज्यभरात खळबळ उडवून देणाऱ्या गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाच्या तपासात पोलिसांनी वाघोली (पुणे) येथून आणखी एक सोनोग्राफी मशीन जप्त केले असून या प्रकरणातील आरोपींची संख्या आता २१ वर पोहोचली आहे.

या संपूर्ण कारवाईत अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी स्वत: लक्ष घालून तपासाची सूत्रे प्रभावीपणे हाताळली आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने आरोपी डॉक्टर, एजंट, मेडिकल चालक आणि वैद्यकीय साहित्य पुरवठादार यांच्या साखळीपर्यंत पोहोचत अवैध व्यवसायाचे जाळे उघडकीस आणले आहे.

या गुन्ह्यात अटक करण्यात आलेला डॉक्टर अतुल अंकुश जाधव (रा. वाघोली, पुणे) याची कसून चौकशी केल्यानंतर त्याने मेडिकल साहित्य पुरवठादार नरेंद्र ठाकरे याच्याकडून बेकायदेशीररित्या सोनोग्राफी मशीन खरेदी केल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी वाघोली येथे कारवाई करून गर्भलिंग निदानासाठी वापरले जाणारे मशीन जप्त केले.

तपासात या मशीनच्या माध्यमातून वाघोली परिसरात अवैधरित्या गर्भलिंग निदान चाचण्या सुरू असल्याचे निष्पन्न झाले आहे. या कारवाईमुळे या रॅकेटचे आणखी एक महत्त्वाचे दुवे पोलिसांच्या हाती लागले आहेत.

दरम्यान, या प्रकरणाचा तपास जसजसा पुढे सरकत आहे तसतसे अनेक जिल्हे आणि तालुक्यांमध्ये कार्यरत असलेल्या एजंटांच्या जाळ्याचा पर्दाफाश होत आहे. अटक आरोपींकडून मिळालेली माहिती आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी या रॅकेटची व्याप्ती राज्यातील विविध भागांपर्यंत पोहोचल्याचे निष्पन्न केले आहे.

विशेष म्हणजे, आतापर्यंत या गुन्ह्यात २१ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये ७ डॉक्टर, ३ मेडिकल चालक आणि एक मोठा वैद्यकीय साहित्य पुरवठादार यांचा समावेश आहे. तसेच अवैध गर्भलिंग निदानासाठी वापरण्यात येणारी ६ सोनोग्राफी मशीन, ४ चारचाकी वाहने आणि १ दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

आता तपासाचा केंद्रबिंदू बेकायदेशीर गर्भपात करणारे संशयित, संबंधित एजंट आणि या रॅकेटमधील इतर सक्रिय घटकांवर असणार असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. या संपूर्ण प्रकरणाचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी भारती आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक आठरे यांचे पथक अत्यंत बारकाईने करत आहे.

अवैध गर्भलिंग निदान आणि कन्या भ्रूणहत्येविरोधातील लढ्यात श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केलेली ही कारवाई राज्यातील अशा गुन्हेगारी साखळ्यांसाठी मोठा धक्का मानली जात असून तपासातून आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# खोट्या कागदपत्रांच्या आधारे ग्रामस्थांची दिशाभूल करू नका : बापूसाहेब लहारे

■ जनप्रवास वार्ताहर

**कोळपेवाडी :** गावची स्मशानभूमी हा गावाचा आणि ग्रामस्थांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा भावनिक प्रश्न असतो मात्र कोल्हे गटाकडून संभाजीनगर (वाकडी) ता. राहाता ग्रामस्थांच्या भावनांशी खेळण्याचे काम सुरु आहे. मौजे संभाजीनगर गावाच्या स्वतंत्र स्मशानभूमीसाठी १० गुंठे जागा मंजूर झाल्याच्या बातम्या सगळीकडे प्रसिद्ध केल्या जात आहे. मात्र याची सत्यता काही वेगळीच असल्याने खोट्या कागदपत्रांच्या आधारे ग्रामस्थांची दिशाभूल करण्याचे काम कोल्हे गट करीत असल्याचा आरोप बापूसाहेब लहारे आणि अण्णासाहेब कोते यांनी केला आहे.

वाकडी अंतर्गत नव्याने स्थापन झालेल्या संभाजीनगर गावात राज्य शासनची गट नंबर ५२ मध्ये एकूण ०.३७ आर जागा असून यातील ०.१० आर जागा गावच्या स्वतंत्र स्मशानभूमीसाठी मिळावी असा प्रस्ताव वाकडी ग्रामपंचायत कडून प्रशासनाकडे दाखल करण्यात आलेला आहे. यामध्ये अनेक प्रशासकीय अडचणी आणि विविध विभागांचे ना-हरकत प्रमाणपत्र येणे बाकी असल्याने आ. आशुतोष काळे हे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करीत आहे. नगररचना विभागाचा अभिप्राय आणि अधिकृत मोजणी नकाशा येणे बाकी असतानाच कोल्हे गटाकडून संभाजीनगर गावासाठी १० गुंठे जागा मंजूर केल्याचा दावा केला जात आहे. कागदपत्रांची अपूर्णता



पूर्ण करायची सोडून उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी यांनी जारी केलेल्या पत्रकावर अंतिम शिक्कामोर्तब करून कोल्हे गट स्वत:ची पाठ थोपटून घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे.

उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी यांनी जारी केलेले पत्रक उघड्या डोळ्याने वाचले असता त्यात स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे कि हे क्षेत्र कोणत्या क्षेत्रात समाविष्ट आहे का या बाबतचा सहायक संचालक आणि नगररचना श्रीरामपूर यांच्याकडून अभिप्राय येणे बाकी आहे. तसेच भूमिलेख कार्यालयाकडून अधिकृत मोजणी अहवाल व नकाशा प्राप्त झालेला नसल्याने कागदपत्रांची अपूर्णता आहे. याच बरोबर पाटबंधारे विभागाने संभाजीनगर गावातील गट नंबर ५२ मधील एकूण क्षेत्र ०.३७ आर जागेवर आपला हक्क दाखवल्या बरोबरच ती जागा वितरिका क्र. १६ लगत असल्याने या ठिकाणी कालवा व्यवस्थापन चौकी आणि वस्तू भांडार उभारण्यासंदर्भात कागदपत्र पाटबंधारे विभागाने उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी यांना सादर केली आहे.

एवढ्या सगळ्या अडचणी असताना कोल्हे गटाकडून जागा मंजूर झाल्याच्या दिशाभूल करणाऱ्या आणि ग्रामस्थांच्या भावनांशी खेळ करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध केल्या जात आहे.

# काष्टीत २४०० मेट्रिक टन क्षमतेचे अत्याधुनिक धान्य गोदाम उभारणार

## भारत सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत सहकारमहर्षी सहकारी सोसायटीला मंजुरी; आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या हस्ते भूमिपूजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** भारत सरकारच्या 'जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजना' अंतर्गत काष्टी येथील सहकारमहर्षी सहकारी सोसायटीला २४०० मेट्रिक टन क्षमतेच्या अत्याधुनिक धान्य गोदामास मंजुरी मिळाली आहे. सुमारे अडीच कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाचे भूमिपूजन गुरुवारी आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस होते.

यावेळी बोलताना आमदार पाचपुते यांनी घोड धरणावरून प्रस्तावित साकळाई योजनेबाबत माहिती दिली. या योजनेमुळे घोड धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होणार नसून सर्व बाबींचा सखोल विचार करूनच नियोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आमची स्वत:ची शेतीही घोड धरणाच्या लाभक्षेत्रात असल्याने शेतकऱ्यांच्या हिताला बाधा पोहोचणार



नाही, याची पूर्ण काळजी घेतली जाईल, असे त्यांनी सांगितले. काष्टी सहकारमहर्षी सोसायटीला सुमारे अडीच कोटी रुपयांचे धान्य गोदाम मंजूर होणे ही संस्थेसाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद करत त्यांनी संचालक मंडळाचे अभिनंदन केले.

कार्यक्रमात बाबासाहेब भोस, घनश्याम शेलार, आण्णासाहेब शेलार, दीपक भोसले, ॲड. विठ्ठलराव काकडे तसेच सहाय्यक निबंधक नारायण परजणे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देत गोदामाचे बांधकाम पुढील सहा महिन्यांत पूर्ण करण्याचा मानस व्यक्त केला. यावेळी सुनंदा पाचपुते, माणिक पाचपुते, व्यंकटेश मुळे, दत्तात्रय गावडे, कैलास पाचपुते, गणेश पाचपुते, नामदेव गावडे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनील माने यांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्थेचे उपाध्यक्ष शहाजी भोसले यांनी मानले.

# मृत्यूच्या उंबरठ्यावर असलेल्या वडाला मिळाले नवे जीवन

## वृक्षप्रेमींच्या पुढाकारातून विशाल वडाचे यशस्वी पुनर्रोपण

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** वीज वितरण व्यवस्थेला अडथळा ठरत असलेल्या आणि रस्त्यालगत अत्यंत धोकादायक अवस्थेत उभ्या असलेल्या वडाच्या झाडाला वृक्षप्रेमींच्या प्रयत्नातून नवजीवन मिळाले आहे. श्रीगोंदा शहरातील स्टेशन रोड परिसरातील सुमारे तीन फूट व्यास व दहा फूट उंचीच्या वडाच्या झाडाचे गुरुवारी यशस्वीपणे पुनर्रोपण करण्यात आले.

जगतगुरु संत तुकाराम महाराज वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष नवनाथ दरेकर यांच्या



मार्गदर्शनाखाली शहरातील वृक्षप्रेमींनी क्रेनच्या सहाय्याने हे झाड सुरक्षितपणे स्थलांतरित करून वन विभागाच्या जागेत लावले. झाडाच्या पुनर्रोपणासाठी आवश्यक खड्डा जेसीबीच्या सहाय्याने खोदण्यात आला. यासाठी धनराज कोंथबीरे आणि जमीर जकाते यांनी विशेष सहकार्य केले.

या उपक्रमाला नगरपरिषदेचाही पाठिंबा लाभला. मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत यांनी झाडाच्या संवर्धनासाठी पाच हजार लिटर क्षमतेचा पाण्याचा टँकर उपलब्ध करून दिला.

यावेळी जिल्हा परिषद समाजकल्याण समितीचे माजी सभापती उमेश परहर यांनी वृक्ष संवर्धन समितीच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, पर्यावरण संवर्धनासाठी झाडे लावणे आणि त्यांचे जतन करणे ही काळाची गरज असून नागरिकांनी अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

या पुनर्रोपण मोहिमेत माजी उपनगराध्यक्ष अशोक खेंडके, नवनाथ दरेकर, धनराज कोंथबीरे, नानासाहेब कोंथबीरे, ऋतिक शिंदे, उमेश परहर, संजय पटवा, प्रा. बापू देवकर, ॲड. सुनील दरेकर, गौरव मेहेत्रे, जमीर जकाते, झहीर जकाते आदींनी श्रमदान करून सहभाग नोंदविला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे शहरात सर्व स्तरांतून स्वागत होत असून वृक्षसंवर्धनासाठी नागरिकांनी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले.

# राहुरी फॅक्टरीत ५७ वर्षीय कर्मचाऱ्याची आत्महत्या; परिसरात हळहळ

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथील डॉ. तनपुरे कारखाना कामगार वसाहतीत दि. १२ जून रोजी दुपारच्या सुमारास एका ५७ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

राहुरी फॅक्टरीतील डॉ. तनपुरे साखर कारखान्याचे कर्मचारी बाळासाहेब तारडे, वय ५७ वर्षे, यांनी त्यांच्या राहत्या घराच्या समोर असलेल्या झाडाला गळफास घेत आत्महत्या केल्याचे आढळून आले.

ही घटना उघडकीस येताच स्थानिक नागरिकांनी तातडीने राहुरी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर घटनास्थळी पोलीस हवालदार बाबासाहेब शेळके यांनी धाव घेत रुग्णवाहिका चालक रविंद्र देवगिरे यांच्या मदतीने त्वरित बाळासाहेब तारडे यांना जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी उपचारा पूर्वीच त्यांना मृत घोषित केले.

त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी राहुरी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. दरम्यान आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

मयत बाळासाहेब तारडे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले, दोन विवाहित मुली, जावई असा मोठा परिवार असून त्यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# प्रेमात बऱ्याच अडचणी उद्‌भवत असतात

प्रेमाची व्याख्या करणे सोपे आहे. घरी वावरताना अनेक प्रसंगातून प्रेम निर्माण करता येते. नवरा-बायको मुला-मुलींच्या संवादातूनही प्रेमाचे फुलोरे फुलविता येतात. कुटुंब सदोदित आनंदी रहावयाचे असेल तर प्रेमाची त्याला जोड दिली पाहिजे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंतचा एकूणच दिनक्रम लक्षात घेतला तर, प्रेम करण्याला वेळ मिळत नाही अशी तक्रार ऐकू येते. पण हे तितकेसे खरे नाही.

प्रेम केवळ तरुणाईनेच करावे असे नव्हे वृद्धापकाळामध्ये पती-पत्नींचे प्रेम विशेष जिव्हाळा निर्माण करणारे असते. आई-वडिल, भाऊ-बहिण,मित्र-मैत्रिणींच्या निरागस प्रेमाबद्दल बरेच काही सांगता येईल. प्रेम केव्हा ही कुठेही कसेही करावे मात्र, हल्लीच्या धक्काधक्कीच्या जीवनात आणि नोकरी धंद्याच्या काळात प्रेम करणे ही अवघड गोष्ट झाली आहे. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धती असताना प्रेम चोरुन करावे लागत असे. आता कुटुंब मर्यादित असल्याने आणि नवरा-बायकोला नोकरी व्यवसायामुळे एकत्रित येणेही कमी होऊ लागल्याने आणि मुले आणि कुटुंब एकत्रित आले तरी, दूर वाहिन्यांमुळे प्रेमामध्ये दुरावा निर्माण होण्याचे प्रकार वाढले आहेत. एखाद्याच्या प्रेमात पडणे चुकीचे नसते. प्रेम कुणा कुणावरही करावे.

हल्ली मुंबईमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रिया आपले वाढदिवस आणि इतर अनेक कार्यक्रम एकत्रित मिळून



रेल्वे डब्यातच साजरे करतात. बारशापासून मकरसंक्रांतीच्या तिळगुळ घ्या गोड बोलाच्या समारंभालाही स्थळ काळाची मर्यादा राहिलेली नाही. शाळकरी मुला-मुलींना एकत्रितपणे वावरु दिले तर प्रेमातील बिभत्सपणाला आळा घालता येईल. मुलींना वाटणारे मुलाबद्दलचे आकर्षण असो किंवा मुलांना मुलींच्या विषयी वाटणारे आकर्षण असो ती एकत्रित आली आणि त्यांनी गप्पा गोष्टीत रस घेतला तर प्रेमाचा खरा अर्थ त्यांना उमगेल. मुलींच्या स्वतंत्र शाळा असण्यापेक्षा मुला-मुलींनी शालेय शिक्षण एकत्रितपणे घेतले तर प्रेम वासनेसारख्या प्रकारांना आळा घालता येईल.

पाश्चात्य संस्कृतीचा आपण स्वीकारच केला असल्याने प्रेमाला नवा अर्थ मिळाला आहे. पूर्वी लहान मुलींची लग्ने पाळण्यात लावली जात असत. पण आता शिक्षणामुळे मुली आणि मुले संस्कारित झाली असल्याने त्यांना प्रेमाचा अर्थ समजला आहे. विवाहपूर्वीचे मित्र-मैत्रिणींचे शाळा महाविद्यालयातील प्रेमाचे संबंध आणि प्रत्यक्ष विवाहानंतर स्त्रियांना येणारा कौटुंबिक प्रेमाचा अनुभव वेगळा असतो. आपण जर एखाद्याच्या प्रेमात पडला असाल, तर प्रेमात बऱ्याच अडचणी उद्‌भवत असतात हे लक्षात ठेवा आणि योग्य ती दक्षता घ्या. असे म्हणतात की, जो स्वत:वर प्रेम करतो तोच दुसऱ्यावरही प्रेम करु शकतो. प्रेमात एकजण वा दोघेही सेल्फ एस्टीमसारख्या समस्येतून जात असतात. जर आपण स्वत: विषयीच खूश नसाल , तर आपला बॉयफ्रेंड वा गर्लफ्रेंड आपल्याला खूश ठेवण्यासाठी नेहमी आपल्याजवळ राहू शकत नसते. अशावेळी आपण एक खराब रिलेशनशिप जगू लागता.

आपला पार्टनर आपल्याकडून काहीशा जादाच अपेक्षा तर करीत नाही ना ? जर आपण रिलेशनशिप एन्जॉय फक्त त्याला स्वत:कडे आकर्षित करीत असाल, तर आपण योग्य पार्टनर निवडला आहे ना याचा जरा विचार करा.

खरे तर जर आपल्या पार्टनरला आपल्या सहवासात सुरक्षितता वा सुख मिळत नसेल, तर हेल्दी रिलेशनशिपमध्ये तो सतत अडथळे आणत राहील असे समजा. टीनएजमध्ये जादा जवळीक करणे कठीणही असते. काहीजण आपली डेव्हलपमेंट, जाणीव व जबाबदारी बाबत एवढे फोकस्ड असतात की ते दुसऱ्यांच्या गरजा व भावना कधीही समजूही शकत नाहीत व त्यांच्याकडे लक्षही पुरवू शकत नाहीत. जर आपला पार्टनरही असा असेल तर आपल्याला धीर धरायला हवा. टीनएजर्सची अफेयर्स जास्त टिकत नाहीत.

कारण या गोइंग एजमध्ये दरदिवशी बदलत असतात. त्यामुळे ज्यांची स्वत:ची वेगळी प्रतिमा असते त्यांचे विचार सतत बदलते असतात, अशा दोन व्यक्तींना एकत्र राहणे कठीण जात असते. बऱ्याचदा पहिल्या नजरेत आपण एकमेकांना परफेक्ट वाटतो. परंतु हा आपला दृष्टीकोन कालांतराने बदलूही शकतो. रिलेशनचे विश्व सर्वांत चॅलेंजिंग असते.

जर हे विश्व आपल्यासाठी फन, रोमान्स, एक्साईटमेंट, फिलिंग्जने भरलेले असेल, तर त्यात वेदनाही वाट्याला येऊ शकते. आपण सिंगल असा वा एखाद्या अफेयरमध्ये एखाद्याशी संबंध जोडू पाहत असाल तर आपण चूजी व्हायलाच हवे.

जर आपण अजूनही आपल्या जीवनात कोणाची वाट पाहत असालतर धीर धरा वा सर्वांना भेटत राहा. मित्राच्या क्वालिटीविषयी विचार करुन भेटाणाऱ्यांपैकी कोण आपल्या कसोटीला उतरते ते पाहा.

# किचनमध्ये जातायं तर जरा इकडे लक्ष द्या

किचनमध्ये स्वयंपाक करण्यापासून ते आवरण्यापर्यंत सारी कामे गृहिणीलाच करावी लागतात. किचन सुंदर, नीटनेटके व उत्तम प्रकारे सजवलेले असणे हे कुशल गृहिणीचे द्योतक असते. जर किचन नीटनेटके, तर आपला त्रासही कमी होतो व घरी येणाऱ्या आपल्या मैत्रिणींकडून व पाहुण्यांकडून आपले कौतुकही होते.

किचनमध्ये काम करताना काही गोष्टींचे भान राखून आपल्याला केअरफुली वावरणेही गरजेचे असते. त्यासाठी खालील दक्षता घ्या.

♦ किचनमध्ये नेहमी सुती कपडे घालूनच वावरावे. टेरलीन, नायलॉन, रेशमी कपडे चटकन पेट घेतात; परंतु घातलेले सुती जास्त डगळे नसावेत तसेच साडीचा पदर, ओढणी खाली लटकलेली नसावी.

♦ गॅस शेगडी पेटवण्यापूर्वी माचिस, लायटर व इतर आवश्यक सामान आपल्या जवळ घेऊन ठेवा.

♦ डाळी, तांदूळ इ. निवडण्याचे काम अन्न शिजवताना न करता अगोदरच करुन ठेवावे.

♦ किचनमध्ये पायात निसरड्या वा उंच टाचांचे सॅण्डल्स घालू नयेत.

♦ व्यंजन कमी प्रमाणात तयार करावयाचे असेल, तर छोटी भांडी वापरावीत. यामुळे गॅसची ही बचत होते.

♦ खाद्यपदार्थ नेहमी झाकूनच ठेवावे कारण त्यात चिलटे, माश्या, झुरळ, पाल वा इतर विषारी वस्तू पडण्याची भीती असते.

♦ स्वयंपाकासाठी नेहमी स्टॅण्डर्ड कंपन्यांचे मसाले व इतर सामान वापरावे.

# हसण्यामुळे माणसाची चयापचय क्रिया सुधारते



हसरा माणूस सर्वांनाच आवडतो. जिथे हसरं, खेळकर वातावरण असतं, तिथे काम करणाऱ्यांची कार्यक्षमता उच्च दर्जाची असते. मनावर ताण नसल्यामुळे तिथली माणसं मोकळेपणानं वावरतात. एकमेकांना सहकार्य करतात. त्यामुळे कामाचा वेग आणि अचूकपणा वाढतो. सतत हसत राहण्यामुळे शरीराला ऑक्सिजनचा भरपूर पुरवठा होतो. त्यामुळे एक प्रकारे शरीराची साफसफाईदेखील होते. जेवणानंतर हास्यविनोदाचा कोणत्या ना कोणत्या प्रकारे आस्वाद घ्या. प्रियजनांशी गप्पा मारा. विनोदी साहित्य वाचा किंवा हास्यपट बघा. त्यामुळे साखरेची पातळी कमी होते. म्हणजेच डायबेटिसचं प्रमाण कमी होतं. हास्य हे नातेसंबंध व स्नेहसंबंध टिकवणारं अमृत आहे.

अप्रिय विषयसुद्धा खेळकर बोलण्यातून चांगले हाताळता येतात. त्यामुळे बोलणाऱ्याच्या मनात आपल्याला अपमानित करण्याचा हेतू नसून सद्‌भाव आहे याची दुसऱ्याला जाणीव होते आणि तो आपल्या चुका सुधारतो. कठोर बोलण्यानं माणसं दुखावली जातात आणि संबंध तुटतात. खेळकर, हसऱ्या संभाषणामुळे मनं प्रसन्न होतात आणि संबंध दृढ होतात, कारण उघड आहे - जो माणूस भेटल्यामुळे मनाला आनंद होतो, त्याचा सहवास माणसाला हवासा वाटतो. त्याच्याशी संबंध चांगले राखण्यासाठी माणूस त्याचं बोलणं ऐकायला तयार असतो. त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागायला तयार असतो. हसऱ्या आणि आनंदी वृत्तीमुळे माणसाचा आत्मविश्वास वाढतो. त्याची इमेज तयार होतो. अशा माणसाला नेतृत्व द्यायला माणसं आनंदानं तयार होतात. रूक्ष, गंभीर भाषणापेक्षा हसरं; पण उद्‌बोधक भाषण माणसाच्या मनावर प्रभाव टाकतं. असं भाषण करणाऱ्याला असंख्य अनुयायी व चाहते मिळतात व ते त्याला नेता बनवतात.

हसाल तर तुमच्याबरोबर सगळं जग हसेल. रडाल तर मात्र एकट्यानं रडत बसावं लागेल, हा अनुभव सार्वत्रिक आहे. हसा आणि लठ्ठ व्हा, अशी दिशाभूल करणारा माणूस नुसता सुकडाच नाही, तर दुष्ट आणि रूक्ष असला पाहिजे किंवा एखाद्या स्लिमिंग पार्लरचा मालक असला पाहिजे. हसण्यामुळे मन हलकं आणि प्रसन्न तर होतंच; पण शरीरालाही अनेक लाभ होतात, असं सिद्ध करणारं संशोधन पुढे आलं आहे. वाढत्या महागाईच्या दिवसात आपल्याला औषधाने कुठे पुरणार आहे ? आपण आपला हसत राहण्याचाच रामबाण इलाज करूया. कारण हसण्यामुळे तात्पुरता का होईना, शारीरिक आणि मानसिक दुःखाचा विसर पडतो.

दुःख चिंता, अडचणी यांच्यामुळे मनाला आणि शरीरालाही जडपणा येतो. हसण्यानं शरीराची हालचाल होते आणि मेंदूलाही 'फ्रेश' वाटतं. दुःखामुळे दुखण्यामुळे येणारी निष्क्रियता दूर होते आणि माणूस पुन्हा कामाला लागतो. हसण्यामुळे तन-मनावरचा भार नुसताच कमी होत नाही, तर तो हसताक्षणीच ताडबतोब कमी होतो. हास्य हे तणावमुक्त होण्यावरचं नैसर्गिक आणि मोफत औषध आहे. शरीरातली ताणतणाव वाढवणाऱ्या द्रव्यांची (हार्मोन्स) पातळी हसण्यामुळे खाली येते. वाढत्या वयोमानाच्या खुणा लपवण्यासाठी हास्य हे सर्वोत्तम 'कॉस्मेटिक लोशन' आहे. जेव्हा हसण्यासाठी चेहऱ्याचे स्नायू प्रसरण पावतात तेव्हा चेहऱ्याला वाढीव रक्तपुरवठा होतो. त्यामुळे सुरकुत्या लपतात, चेहऱ्यावर लाली येऊन त्वचा आर्द्र बनते. परिणामी, माणसाचं वाढतं वय त्यात बेमालूम लपून जातं. हसण्यामुळे ताण कमी झाला की, स्वस्थ झोप लागते. म्हणूनच झोपण्यापूर्वी टीव्ही पाहात बसाल, तर एखादा विनोदी चित्रपट पाहा किंवा जोक बुक वाचा.

रात्रीच्या जेवणासाठी सगळे कुटुंबीय एकत्र येत असाल, तर मन प्रसन्न करणारे विषय काढा आणि गप्पा मारा. थट्टामस्करी करा. भरपूर हसा. त्यामुळेही झोप चांगली लागेल. हसण्यामुळे माणूस लठ्ठ होतो, हा गैरसमज आहे. उलट हास्य माणसाला बारीक होण्यासाठी मदत करतं. हास्या मुळे माणसाची चयापचय क्रिया सुधारते. हृदयाचे ठोके नियमित व सुरळीत पडतात. हसण्यामुळे उष्मांक (कॅलरीज) नष्ट होतात. हसण्यामुळे होणारी पोटाची हालचाल हा एक चांगला व्यायाम आहे. त्यामुळे पोटाचे स्नायू लवचिक होतात, कार्यक्षम राहतात. त्यामुळे त्यांना सुरळीत रक्तपुरवठा होतो. हास्य हा दम्यावर प्रभावी, प्रतिबंधक उपचार आहे. फुप्फुसांभोवची जमणारी अतिरिक्त हवा हसण्यामुळे दूर होते.

# बॉस हा हुकुमशहा नव्हे, तर चांगला नेता असला पाहीजे

बॉस म्हणजे ऑफिससातल्या कर्मचाऱ्यांवर खेकसण्यासाठी ठेवलेला हूकूमशहा नव्हे. आज कोणत्याही क्षेत्रात श्रेष्ठ असलेल्या माणसाला बॉस म्हणून हाक मारतात. यावरून बॉसची पात्रता, त्याची गुणवत्ता लक्षात यावी.

बॉस हा हुकूमशहा नव्हे, तर चांगला नेता असला पाहिजे. प्रामाणिकपणे, निर्दोष काम करणं, अकारण रजा न घेणं, सर्वांना कामात मदत मार्गदर्शन करण्यासाठी तयार करणे, सर्वांचा विश्वास व आदर संपादक करून त्यांच्याकडून उत्तम काम करून घेणं या बॉसबद्दलच्या अपेक्षा असतात. त्या पूर्ण करण्यासाठी स्तव:च्या वर्तनातून आणि कार्यपध्दतीतून त्यानं इतरांपुढे आदर्श हे साध्य करण्यासाठी त्यानं आधी चांगला सहकारी, चांगला माणूस असलं पाहिजे.

बॉस म्हणून यशस्वी व्हायचे असेल तर...

○ आपण कुणी वेगळे नाही याची जाणीव ठेवा. बॉस होण्यापूर्वी तुम्हीही साधे कारकून होता हे विसरू नका.

○ आणि म्हणूनच हाताखालच्या शिपायापासून प्रत्येक सहकाऱ्याला सन्मानानं वागवा. त्यामुळेच तुम्हाला सर्वांचं सहकार्य मिळेल.

○ शक्य तर तुमच्या प्रत्येक सहकाऱ्याला नावानं हाक



मारा. प्रत्येक माणूस आपल्या नावाबद्दल हळवा असतो. अहंकारीदेखील असतो. नावानं हाक मारलीत तर, तुम्ही सहकाऱ्यांना जिंकू शकाल.

○ हाताखालच्या माणसांच्या चुका अवश्य दाखवा. चुकार कर्मचाऱ्याला शिक्षासुध्दा करा, पण हे सर्व कामाचा भाग असल्याप्रमाणे घडलं पाहिजे. त्यामागे तुमचा वैयक्तीक रागलोभ आहे, असं समोरच्या माणसाला वाटता कामा नये.

○ सर्व सहकाऱ्यांना समान वागवा. कुणालाही डोळ्यात खुपले अशी पक्षपाती वागणूक देऊ नका. कुणाही एका व्यक्तीला जादा सुविधा, सवलती देऊ नका.

○ प्रत्येक सहकाऱ्याशी किमान जवळीक ठेवा. त्याच्या अडचणी, समस्या माहीती करून घ्या. एका मर्यादेपर्यंत त्याला सहानुभूती दाखवा, मदत करा.

○ कोणत्याही कर्मचाऱ्याला व्यावसायिक वैयक्तीक अडचण आली, तर ऑफिसच्या वेळात तुम्ही कधीही उपलब्ध असाल, असा विश्वास निर्माण करा.

○ चांगलं काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला ताबडतोब शाबासकी द्या. प्रोत्साहित होऊन तो अधिक चांगलं काम करील.

○ कोणत्याही कर्मचाऱ्याशी खासगी संबंध ठेवू नका, पण प्रत्येकाशी किमान चांगले संबंध ठेवा. कोणत्याही कर्मचाऱ्याला तुमच्याशी बोलताना भीती वाटता कामा नये. तो थेट तुमच्याशी बोलू शकेल, असे संबंध राहू द्या.

○ कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक कौशल्यापलीकडे एखादं कौतुक असेल, तर त्यांचही अवश्य कौतुक करा. ○ कधी रागवायचं आणि कधी चुचकारायचं हे कौशल्य अंगी बाणवून घ्या.

# मेकअपची बेसिक पध्दत प्रत्येकाने जाणून घेणे जरूरी

सुंदर दिसणे ही प्रत्येकाची प्राथमिकता आहे. आपण दररोज तयार होण्यासाठी पुरेसा वेळ नसेल तर कमीत कमी इतका प्रयत्न जरूर करावा की आपल्या रूपामध्ये कोणत्याही प्रकारची कमी राहू नये. सौंदर्य विशेषज्ञांच्या अनुसार मेकअपची बेसिक पध्दत प्रत्येकाने जाणून घेणे जरूरीचे आहे.

मेकअपमधील छोट्या, छोट्या गोष्टीही या दृष्टीने महत्वपूर्ण ठरतात. ज्यांच्या सहाय्याने आपण नेहमी स्मार्ट आणि सुंदर दिसू शकाल.

नखांची नेलपॉलिश आपली सौंदर्यप्रती असलेली जागरूकता दर्शविते. यासाठी नखांसाठी नवनवीन नेलपॉलिशचा उपयोग करावा. जुनी



अगोदरची नेलपॉलिश रिमूव्हने दूर करून त्यावर नवीन नेलपॉलिशचा थर द्यावा.

○ बाजारामध्ये अनेक शेडस्‌चे हेअर कलर उपलब्ध आहेत. सफेद केसांना हेअर कलरचा उपयोग करताना आपल्या स्क्रिन टोनशी मॅच होणारा कोणताही हेअर कलर निवडावा.

शक्यतो केसांसाठी दोन शेडच्या हेअर कलरची निवड करावी. जेणेकरून त्यांचा चांगला इफेक्ट मिळेल.

○ कोरड्या आणि निस्तेज केसांसाठी अनेक उपाय उपलब्ध आहेत. अत्याधिक कोरड्या केसांसाठी थोड्याशा पाण्यामध्ये तीन-चार थेंब तेल मिसळून लावावे आणि केस बांधून ठेवावेत.

○ चेहऱ्याच्या सौंदर्यात ओठांवरील लिपस्टिकने अधिक भर पडते. आपल्या ओठांवर लिपस्टिक अधिक वेळ टिकून राहात नसेल तर नेहमी क्रिमीमॅटची लाइट शेडची लिपस्टिक निवडावी. लिपस्टिक लावण्याअगोदर हलकेसे फाऊंडेशन लावावे. मॅट लिपलाइनरने आउटलाईन बनवावी व नंतर लिपस्टीक लावावी.

○ शाप आयब्रोजचा असर जबरदस्त असतो. आपण कितीही चांगला मेकअप आपण कितीही चांगला मेकअप केला तरी आयब्रोजशिवाय तो उठून दिसणार नाही. यासाठी आयब्रोजला मेकअपला साजेसा शेप द्यावा. अशा प्रकारच्या मेकअप टिप्स अवलंबून आपण नेहमी स्मार्ट आणि सुंदर दिसू शकाल.

# पुरुषांपेक्षा स्त्रियांना कमी वेतनश्रेणी का असते

ब्रिटिश सरकारच्या इक्वॅलिटी ऑफिसचे प्रमुख हॅरिएट हर्मन यांच्या एका प्रस्तावाकडे स्वाईन फ्ल्यू तत्सम घटनांमुळे बहुतेक सगळ्यांचे दुर्लक्ष झाले. त्यावर तीव्र पडसाद उमणे उपेक्षित होते पण, तो प्रस्तावच दुर्लक्षित झाल्यानेच ते विस्मृतीत गेले. हॅरिएट यांनी आपल्या प्रस्तावात असे म्हटले होते की, सर्व ब्रिटिश महिलांची गर्भाशये काढून टाका त्यंना स्टॉक ब्रोकर म्हणून कामावर पाठवा म्हणजे पगारातील तफावत कमी होईल. हॅरिएट यांनी इक्वॅलिटी बिल प्रसिद्ध केले. त्यात ब्रिटिश पुरुषांना जे जे काही मिळू शकते ते ते सर्व ब्रिटिश स्त्रियांना मिळाले पाहिजे, असे म्हटले होते. आज केवळ लिंगभेदामुळे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळत नाही. पुरुषांना स्त्रियांपेक्षा २० टक्के वेतन जास्त दिले जाते असेही त्या म्हणाल्या. स्त्री-पुरुष समानतेचा जगभर कितीही डांगोरा पिटला असलातरी, लिंगभेदामुळे त्यांच्या वेतनात तफावत नेहमी आढळते. त्याची कारणमीमांसा.

मागील वार्षिक सर्व्हेक्षणातून असे सूचित होते की,



पुरुष व स्त्री यांच्यातील पगाराच्या फरकाच्या संदर्भात वेगळाच मुद्दा पुढे आला. त्यात म्हटे की, पुरुष हे स्त्रियांपेक्षा जास्त तास काम करतात म्हणून पुरुषांना स्त्रियांपेक्षा जास्त पगार दिला जातो. स्त्रियांना मुलांची देखभाल करावी लागते. ताटावरून पाटावर आणि पाटावरून ताटावर असे स्त्रियांच्या नशिबात नसते. समानता आणि मानवी हक्क आयोगाने अलीकडेच प्रसिद्ध केलेल्या अहवालात अशी तक्रार करण्यात आलेली आहे की, ६ हजार स्त्रिया शहरातील टॉप बोर्ड रूम जॉबमध्ये मिसिंग आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल की, वरिष्ठ पदावर स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या जास्त आहे. थोडक्यात निष्कर्ष असा निघतो की, लिंगभेदामुळे स्त्री-पुरुषांच्या वेतनात फरक पडतो.

जानेवारी २००९ मध्ये प्रकाशित झालेल्या सर्व्हेक्षणात असे म्हटले आहे की, घराची घडी बसविण्याकडे स्त्रियांना पुरुषांपेक्षा अधिक लक्ष द्यावे लागत असल्याने त्यांची कामावरील निष्ठा ही पुरुषांच्या तुलनेत कमी असते, त्यामुळे स्त्री-पुरुषांच्या वेतनश्रेणीत सर्वत्रच तफावत आढळते. प्रत्येक ब्रिटिश महिलेचे गर्भाशय तशी टाकण्यात यावे, अशी हॅरिएटची तशी खरोखरच मूळ योजना नव्हती. पण त्यामुळे स्त्री-पुरुषाच्या वेतनात समानता येऊ शकले, असा विश्वास वाटतो.

दरम्यान, पुरुषांपेक्षा स्त्रियांना कमी वेतनश्रेणी का असते याची कारणमीमांसा सांगताना म्हटले आहे की, स्त्रिया कमी तास काम करतात. कामावरील त्यांची निष्ठा दीर्घकाळ टिकून राहात नाही, त्यामुळे त्यांच्याकडून जास्त परिश्रम घेतले जाऊ शकत नाहीत. त्यामुळे त्याच्या व पुरुषांच्या वेतनात फरक असतो.

# भोजन झोपायच्या वेळेअगोदर दोन तास घ्यावे

भोजन तयार करण्याच्या पद्धतीही आहाराला प्रभावित करतात. अर्थातच भोजन बनविण्याच्या पद्धतींचा भोजनावर प्रभाव पडतो. यावरही आहारातील पौष्टिकता निर्भर असतो.

भाज्या कापणे, शिजविणे तसेच तयार झाल्यावर भोजनसमयी व्यवस्थितरीत्या ताटामध्ये वाढणे अशा छोट्या-मोठ्या प्रक्रियांचा आहाराच्या पौष्टिकतेवर थेट प्रभाव पडतो. विशेषज्ञांच्या सल्ल्यानुसार, सकाळी नाष्ट्यामध्ये हलवा, मोड आलेली कपडधान्ये तसेच ढोकळे, जिलेबी, दही, इडली-सांबर यांसारखे पदार्थ घेणे लाभदायक आहे. सकाळच्या वेळात हे पदार्थ चांगल्या प्रमाणात घेण्याने दिवसभरासाठी शरीर तंदुरुस्त आणि फिट राहाते. तसेच दुपारच्या जेवणामध्ये हिरवी भाजी, चपाती, डाळ, दही, भात, सॅलड आणि एखादे फळ यांचा समावेश करून पूर्ण आहाराचा लाभ घेता येतो. संध्याकाळच्या वेळी नाष्ट्यामध्ये चहा बरोबर दोन बिस्कीटे घेता येऊ शकतील, तर रात्रीचे भोजन हलके असावे. रात्रीचे भोजन झोपावयाच्या वेळेच्या दोन तास अगोदर घ्यावे.

झोपावयास जाताना कोमट दूध पिण्याने झोप चांगली येते. याशिवाय हवामानानुसार तीळ, बेसन आणि डाळींचे लाडू तसेच इतर अन्य पौष्टिक पदार्थ वेळो-वेळी घेत राहिल्याने तंदुरुस्त राहण्यास साह्य मिळते. पौष्टिक तत्त्वांचे ध्यान ठेवून वरीलप्रमाणे घेतलेला आहार संपूर्ण आहार ठरतो. तंदुरुस्त राहाल यात शंका नाही.

# जर आपण श्रीमंत असाल तर, नातेवाईकांना मदत करणे आपले कर्तव्य

विभक्त कुटुंबाच्या ट्रेंडने नातेवाईकांसोबतच नात्यांचे महत्व कमी केले आहे. याचे कारण परस्पर प्रेमाचा अभावही असू शकतो व आपल्या वागण्यातील कौशल्याची उणीवही जाणून घेऊ यात. नात्यातील दुराव्याची कारणे व ती आपण कशी दूर करु शकतो ते.

**अपेक्षा कमी ठेवा :-** नाते कोणतेही असो त्यातील दुराव्याचे कारण एकमेकांच्या अपेक्षा पूर्ण न होणे हेच असते. बऱ्याच जणांच्या मते, आपले नातेवाईक सुख-दुःखात सहभागी झाले नाही, तर त्या नात्यांना काय अर्थ आहे. पण हे लक्षात घ्यायला हवे की, त्यांच्या आपल्याबद्दलच्या भावना खऱ्या असतील, तर ते न येण्यामागे तसेच काही विशेष कारण असू शकेल. यासाठी निराश न होता ते सहजतेने स्वीकारायला हवे.

**कटू बोलू नका :** नातेवाईकांविषयीच्या दुर्भावना व राग कधी कधी लपू शकत नाही व कटू बोलण्याने बाहेर येतो. यामुळे नात्यांत कायमचा दुरावा येऊ शकतो. यासाठी स्वत:वर ताबा ठेवा व कटू बोलणे टाळा.

नातेवाईकांना प्रगतीबद्दल शुभेच्छा द्या-



जर आपल्या नातेवाईकाला प्रमोशन मिळाले असेल वा त्यांच्या मुलांनी यश मिळवले असेल, तर त्वरीत अभिनंदन करायला जा वा फोनव्दारे करा. यामुळे आपले नाते जास्त बळकट होईल.

**लावालावी टाळा :-** लावालावी वा भांडणे लावणाऱ्यांना कोणी चांगले समजत नाही. उलट त्याच्यासमोर बोलायला कचरले जाते. जर आपल्या नातेवाईकाची एखादी गोष्ट खटकली तर ती हिंमत करुन त्यालाच सांगा वा विसरुन जा.

**गिफ्टही हवी :-** जवळ राहात असलेल्या नातेवाईकांच्या घरी जायचे असेल तरी छोटी-मोठी गिफ्ट घेऊन जायला विसरु नका. कोठे फिरायला गेला, तर आपल्या नातेवाईकांसाठी काही ना काही अवश्य खरेदी करा. भले ते महागडे नसले तरी विचारपूर्वक उपयुक्त वस्तूच द्या.

**नातेवाईकांना जमेल तशी मदत करा :-** जर आपण श्रीमंत असाल, तर नातेवाईकांना मदत करणे आपले कर्तव्य आहे. ही मदत आर्थिकही असू शकते आणि मानसिकही.

जर आपले नातेवाईक परीक्षेत नापास झाले वा त्यांना एखाद्या कामात अपयश आले, तर त्यांचे जमेल तेवढे सांत्वन करा व त्यांचे मनोधैर्य वाढवा. या अत्यंत साध्या गोष्टी आहेत; परंतु जर आपण त्या लक्षात ठेवून कराल, तर आपले संबंध मधुर राहतील.

# रोजच्या कटकटीऐवजी वेगळ्या गप्पा मारा

विवाहानंत सुरुवातीला पती-पत्नी जास्तीत जास्त वेळ एकमेकांच्या सहवासात घालवू इच्छित असतात, पण हळूहळू एकत्र बसणे कमी होते. उभयतांपैकी एकाचे जरी अशा एकत्र बसण्याकडे दुर्लक्ष होऊ लागले तेव्हा संबंध बिघडू लागतो. जीवनातील घर, संसार, नोकरी, व्यवसाय अशा दैनंदिन कामात ते एवढे गुरफटून जातात की, जीवनातील सर्वात महत्वाचे काम ज्यावर संपूर्ण नाते आधारलेले असते तेच विसरून जातात.

रोज आपल्या जोडीदारासोबत बसण्यासाठी काही वेळ अवश्य काढायला हवा. त्यावेळी रोजच्या कटकटींऐवजी वेगळ्या गप्पा मारायला.

आपल्या ज्या गरजा पूर्ण होत नाहीत त्याविषयी आपल्या जोडीदाराला अवश्य सांगा. जोडीदार एकमेकांच्या भावना कितीही जाणत असला, तरी जेवढ्या तो स्वत:च्या गरजा समजतो. तेवढ्या समजू शकत नसतो. यासाठी तो आपली गरज जाणून ती पूर्ण करील याची वाट पाहू नका. आपला स्वत:वर व आपल्या प्रेमावर पूर्ण विश्वास असेल, आपली गरज सांगायला बिचकायचे का ? एकमेकांना पुढे जाण्याची संधी द्या. काही पती-पत्नींना आपल्या जोडीदाराची प्रगती सहन होत नाही. त्यामुळे आपले महत्व कमी होईल अशी भीती त्यांना वाटत असते, परंतु असे वागणे योग्य नव्हे. आपल्या जोडीदाराला प्रगतीची पूर्ण संधी द्या. कारण त्याच्या प्रगतीतून आपल्यालाही प्रेरणा मिळू शकते.

आपल्या जोडीदाराला कमी समजू नये. काही जोडप्यांना एकमेकांचे दोष सर्वांसमोर सांगण्याची व थट्टा करण्याची सवय असते. याचा परिणाम चांगला होत नाही यामुळे नैराश्य वाढते. जोडीदाराचा आत्मविश्वास ढासळतो. वास्तववादी व्हा. वैवाहिक संबंध कधीही स्वत: होऊन पूर्ण होत नसतात. एखाद्याचे वैवाहिक जीवन संतुष्ट व पूर्ण मानून त्याच्याशी आपल्या कमी सुखी जीवनाची तुलना करून तणावग्रस्त करू नका. पती-पत्नी दोघांनीही आपल्यातील उणिवा जाणून घ्याव्यात. आपले संबंध नीरस, उबग आणणारे व कठीण स्थितीत असतानाही जिवंत राखा. प्रेमातील तक्रारी करण्याऐवजी त्या दूर करण्याचा प्रयत्न करा.

# स्तनपान करण्याची नेमकी पद्धत काय आहे? डॉक्टर काय सांगतात?

आईच्या दुधाच्या निर्मितीसाठी विशिष्ट प्रकारची संरचना असते. साधारणत: बाळाला वयाच्या सहा महिन्यांपर्यंत केवळ हाच आहार देण्यात येतो. पण बाळाला योग्य पद्धतीने स्तनपान देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण चुकीच्या पद्धतीने केलेल्या स्तनपानाने मातेला पाठदुखी, स्तनांना सूज येऊन त्यात रक्त किंवा पाणी साठणे, ताप येणे इत्यादी समस्या उद्‌भवू शकतात. आज आपण पाहू या डॉ. अमृता पुनसे तुपकर यांनी सांगितलेली स्तनपानाची योग्य पद्धत.

**आईला आरामदायक स्थिती**

बाळाच्या आईला जी स्थिती आरामदायी वाटत असेल त्या स्थितीत तिने स्तनपान द्यावे. (right position for breastfeeding) त्यावेळी तिच्या पाठीला आधार असणे महत्त्वाचे आहे. स्तनपान देण्यासाठी भारतीय पद्धत, क्रेडल पद्धत, मॉडिफाईड क्रेडल पद्धत, साईड लाइंग पद्धत (आडवे पडून बाळाला स्तनपान देऊ नये, हा एक गैरसमज आहे) या सर्व पद्धतींमध्ये उत्तम आरामदायी स्तनपानासाठी काही नियम पाळले गेले पाहिजेत.

डॉ. अमृता पुनसे तुपकर यांनी सांगितलेली माहिती येथे पहा

**काय आहेत नियम**

**अ.** बाळाचे तोंड पूर्ण उघडले असावे.

**ब.** बाळाच्या हनुवटीचा स्पर्श स्तनाला व्हावा.

**क.** स्तनमंडल आधी बाळाच्या तोंडाच्या वर आणि नंतर खालून दिसावे.

**ड.** बाळाचा खालचा ओठ बाहेरच्या बाजूला वळलेला असावा.

सर्व स्थितींमध्ये बाळाचे पूर्ण शरीर आईच्या समोर असावे. बाळाचे डोके, मान यांना शरीराच्या एका रेषेत आधार मिळावा आणि ते स्तनांच्या समोर असावे. स्तनाचा योग्य प्रकारे स्पर्श होत असेल तर दूध पुरेसे येते, ते बाहेरही सुरळीत निघते आणि बाळापर्यंत त्याचा प्रवाहही योग्य राहतो.

**जन्मल्यापासून लवकरात लवकर स्तनपान**

स्तनपानासाठी बाळ जन्मापासून आईजवळ दिवस-रात्र असणे अपेक्षित आहे. सामान्य प्रकृती असलेल्या बाळाला जन्मानंतर तीस मिनिटांच्या आत आईच्या पोटावर किंवा छातीवर ठेवावे. त्यामुळे बाळाला उब मिळते आणि स्तनपान करण्याची संधी मिळते. स्तनपान जेवढ्या लवकर सुरू होईल, तेवढ्या लवकर आई आणि बाळामध्ये भावनिक बंध निर्माण होतो.



**बाळाची भूक**

आईला बाळाच्या भुकेचे संकेत (मुठी चोखायला लागणे, डोके स्तनांकडे वळविणे, स्तन शोधणे) समजून आणि बाळ रडेपर्यंत थांबण्याऐवजी त्याचे संकेत समजून स्तनपान द्यावे. वेगवान स्तनपान करणारी बाळे साधारणत: ५-६ मिनिटांत पूर्ण स्तन रिकामा करतात आणि मंद स्तनपान करणारी बाळे स्तनपानास १५-२० मिनिटे लावतात. बाळ पाणीदार, अधिक प्रमाणातील लॅक्टोज, प्रथिने, जीवनसत्वे, क्षार आणि पाणी ग्रहण करते आणि त्याची तहान भागवते.

**योग्य क्रम**

अग्रभागातील दूधातून आवश्यक ते घटक बाळाला मिळतात. मागील भागातील दुधात स्निग्धांश मोठ्या प्रमाणात असतात आणि त्यामुळे बाळाची भूक भागते. बाळाच्या सुदृढ वाढीसाठी हे आवश्यक असते. त्यामुळे बाळाची इच्छा असेपर्यंत त्याला स्तनपान द्यावे. स्तनपानामुळे बाळाची तहान आणि भूक दोन्ही भागते. जेव्हा बाळ पहिले स्तन स्वत:हून सोडते तेव्हा आईने त्याला दुसर्या स्तनापाशी घ्यावे. बाळाची तहान-भूक भागली असेल तर ते दुसर्या स्तनाचे स्तनपान करणार नाही. दुसर्या स्तनपानाच्या वेळी पहिल्यांदा दुसऱ्या स्तनाने पाजावे, जेणेकरून दोन्ही स्तनांमधून पुरेसे दूध मिळेल.

**टीप :** हा लेख केवळ सामान्य माहितीच्या उद्देशाने आहे. हा वैद्यकीय सल्ला, निदान किंवा उपचारांचा पर्याय नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

■■■

## मंद सुगंधाने व्हा धुंद

■ एखाद्या पार्टीला चालला असाल, तर मंद सुगंधाचा वापर करा.

■ सकाळी व सायंकाळी सुगंधाचा वापर करणे उत्तम असते.

■ सुंगध वापरण्यापूर्वी आपले शरीर व्यवस्थित स्वच्छ करा.

■ कूलरच्या पाण्यात वा वाळ्यात सुंगध ठेवून थंड वाऱ्यासोबत मंद सुगंधाचा आनंद लुटा.

■ मान, कानाजवळ, काखेत सुंगधाचा वापर करणे डॉक्टरांनी योग्य समजले आहे.

■ प्रियकर-प्रेयसी, पती-पत्नी यांना पाठवण्याच्या प्रेम पत्रांमध्येमंद सुगंधाचा वापर करता येतो.

■ झोपताना उशीवर व बिछान्यावर मंद सुगंध शिडकल्यास सुखद झोप येईल.

■ कपड्यांवर सुगंध वापरताना अंतर्वस्त्रांना सुगंधाचा वापर करावा. यामुळे तो जास्त काळ टिकेल.

■ पार्टी व इतर प्रसंगी टेबलावर सजवून ठेवलेल्या कृत्रिम फ्लॉवरपॉटवर सुगंध स्प्रे करुन वातावरण सुंगधित होईल.

# पावसात लसूणला बुरशी येणार नाही, लसूण साठवण्याची सर्वोत्तम पद्धत

## महिनोनमहिने राहील ताजा

भारतातील अनेक भागात पावसाचे आगमन झाले आहे. अशा परिस्थितीत हवेतील आर्द्रता वाढली आहे. वाढत्या आर्द्रतेमुळे स्वयंपाकघरात ठेवलेला लसूण सहजपणे बुरशीचा बळी पडू शकतो. खरं तर, प्रत्येक स्वयंपाकघरात लसूण मसाला म्हणून वापरला जातो. तो केवळ अन्नाची चव वाढवतोच, परंतु आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे. परंतु अनेकदा लोक तक्रार करतात की पावसाळ्यात लसूण लवकर खराब होतो किंवा बुरशी येते. परंतु जर लसूण योग्यरित्या साठवला तर तो महिनोनमहिने ताजा राहू शकतो. येथे सांगितलेल्या केलेल्या सोप्या आणि प्रभावी पद्धतींचा अवलंब करा आणि लसूण बराच काळ खराब होण्यापासून वाचवू शकता.

**लसूण कोरड्या आणि थंड जागी ठेवा** : लसूण साठवण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे तो कोरड्या आणि थंड जागी ठेवणे. लसूण ओलाव्यापासून दूर ठेवणे खूप महत्वाचे आहे, कारण ओलाव्यामुळे त्यात बुरशी येऊ शकते. तुम्ही ते सावलीच्या ठिकाणी किंवा सामान्य खोलीच्या तापमानात ठेवू शकता.



**जाळीदार पिशव्या किंवा कागदी पिशव्या वापरा** : लसूण साठवण्यासाठी प्लास्टिकच्या पिशव्यांऐवजी जाळीदार पिशव्या किंवा कागदी पिशव्या वापरा.

या पिशव्या हवेचा प्रवाह राखतात, ज्यामुळे लसूण बराच काळ ताजा राहतो. अशा जाळीदार पिशव्या बाजारात सहज उपलब्ध आहेत, ज्यामध्ये तुम्ही काळजी न करता लसूण साठवू शकता.

**काचेच्या भांड्यात साठवा** : जर तुम्हाला लसूण जास्त काळ साठवायचा असेल तर तो काचेच्या भांड्यात ठेवा. काचेच्या भांड्यात लसूण ठेवा आणि त्याचे झाकण थोडे उघडे ठेवा जेणेकरून त्यात ओलावा जमा होणार नाही. लक्षात ठेवा की भांडे थंड आणि कोरड्या जागी ठेवावे.

**लसूण सोलून गोठवा** : दुसरा सोपा मार्ग म्हणजे लसूण सोलून फ्रीजरमध्ये ठेवणे. यासाठी, लसूण पाकळ्या सोलून हवाबंद डब्यात ठेवा आणि गोठवा. यामुळे लसूण ताजे तर राहीलच, शिवाय वापरण्यासही सोपे होईल.

**लसूण पेस्ट बनवा आणि साठवा** : लसूण बराच काळ साठवण्याची ही पद्धत खूप लोकप्रिय आहे. यासाठी, लसूण सोलून त्याची पेस्ट बनवा आणि फ्रीजमध्ये हवाबंद डब्यात ठेवा. त्यात थोडे मीठ किंवा तेल घालून तुम्ही पेस्टची ताजेपणा वाढवू शकता.

**लसूण तेलात बुडवा** : जर तुम्हाला लसूण महिने टिकवायचा असेल तर तो तेलात बुडवा. यासाठी लसूण पाकळ्या सोलून काचेच्या भांड्यात ठेवा आणि त्यावर ऑलिव्ह ऑइल ओता. अशा प्रकारे लसूण बुरशी येणार नाही आणि बराच काळ ताजा राहील.

**लसूण उन्हात वाळवा** : लसूण साठवण्याची पारंपारिक पद्धत म्हणजे तो उन्हात वाळवणे. लसणाच्या पाकळ्या उन्हात पूर्णपणे वाळवाव्यात आणि नंतर त्या कागदी पिशवीत किंवा काचेच्या भांड्यात ठेवाव्यात.लसूण योग्यरित्या साठवणे खूप सोपे आहे. जर तुम्ही वर उल्लेख केलेल्या कोणत्याही पद्धतींचा अवलंब केला तर तुमचा लसूण अनेक महिने ताजा आणि बुरशीमुक्त राहील. या सोप्या पद्धतींमुळे तुमचा वेळ तर वाचेलच, पण लसणाची गुणवत्ताही चांगली राहील.

# चहाबरोबर चुकूनही पकोडे खाऊ नका; वाचा तज्ज्ञांनी सांगितलेले कारण

सकाळ असो किंवा संध्याकाळ, अनेकांना गरमागरम कुरकुरीत पकोड्यांबरोबर चहा पिणे आवडते. खरं तर तळलेले पदार्थ आरोग्यासाठी हानिकारक असतात आणि जर हे पदार्थ तुम्ही चहाबरोबर खात असाल तर त्याचा परिणाम पचनक्रिया आणि पोषक तत्वांच्या शोषण क्षमतेवर दिसून येतो, त्यामुळे पकोड्यांबरोबर चहा प्यावा का हा प्रश्न निर्माण होतो. आज आपण त्याविषयी सविस्तर माहिती जाणून घेणार आहोत.

**चहासह पकोडा खावा का?**

मुंबईच्या सर एचएन रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटल येथील क्लिनिकल आहारतज्ज्ञ वेदिका प्रेमानी यांनी याविषयी माहिती दिली. त्या सांगतात की, चहासह पकोडा खाणे हे आरोग्यासाठी चांगले नाही, पण त्यात आले, दालचिनी आणि वेलचीसारख्या पोषक पदार्थांचा समावेश असतो, ज्यामुळे चहाची चव तर वाढतेच पण त्याबरोबर रोगप्रतिकारक शक्तीसुद्धा वाढते आणि चहा अँटी इन्फ्लामेटरी (शरीराच्या वेदना किंवा सूज कमी करण्यासाठी वापरले जाणारे घटक) म्हणून काम करते. बेकिंग आणि एअर फ्रायिंगसारख्या इतर स्वयंपाक पद्धतीचा वापर करून शरीरास निरोगी असलेल्या तेलांमध्ये पकोडे तळले तर याचा आनंद घेता येतो.

चहा आणि पकोडा आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे वैज्ञानिक कारण काय आहे?

चहामध्ये टॅनिन आणि ऑक्सलेट असतात. जेव्हा पोषक घटकांचा समावेश असलेल्या अन्न पदार्थांबरोबर चहाचे सेवन केले जाते, तेव्हा त्या पदार्थातील लोह आणि कॅल्शियमसारख्या पोषक तत्वांचे शोषण कमी होते. याशिवाय वारंवार गरम केलेल्या तेलात तळलेले पकोडे खाल्ल्याने ट्रान्स फॅटी ॲसिडसुद्धा शरीरात तयार होते, असे वेदिका प्रेमानी सांगतात.



**चहासोबत कोणते पदार्थ खाणे टाळावेत?**

अनेक जण चहाबरोबर बिस्किटे आणि कुकीज खातात, ज्यामध्ये फॅट्स आणि साखर असते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते.

चहाबरोबर आणखी आवडीने खाल्ला जाणारा लोकप्रिय नाश्ता म्हणजे समोसा, ज्यामध्ये फॅट्सचे प्रमाण सर्वाधिक असते.

ब्रेडसारखे इतर बेकरीचे पदार्थसुद्धा चहाबरोबर खाणे योग्य नाही, कारण त्यात सोडियम, साखर आणि सॅच्युरेटेड फॅटी ॲसिडचे प्रमाण अधिक असते.

चहाबरोबर खाता येईल असे आरोग्यदायी पदार्थ कोणते आहेत?

हेल्दी नाश्त्याच्या पर्यायांमध्ये बेक्ड रागी चिप्स, ढोकळा, मखाना, चना चाट आणि हंग दह्यासह खाकरा, एअर फ्राइड भाज्यासुद्धा पकोड्यांना चांगले आरोग्यदायी पर्याय असू शकतात, असे वेदिका प्रेमानी सांगतात.

त्यांनी हेल्दी चहाचे काही पर्यायसुद्धा सुचवले आहेत, जे तुम्हाला फायदेशीर ठरू शकतात.

**कॅमोमाइल चहा :** हा चहा त्याच्या आरामदायी गुणधर्मांसाठी ओळखला जातो. यामुळे शांत झोप लागते. तणाव कमी होतो.

**रोझमेरी चहा :** यात असलेले अँटीऑक्सिडंट प्रभावी असतात, जे व्यक्तीची कार्यक्षमता सुधारण्यास मदत करतात.

**हळद आणि आल्याचा चहा :** हळदीमध्ये अँटी इन्फ्लामेटरी गुणधर्म असतात, जे रोगप्रतिकारक शक्ती सुधारण्यास मदत करतात.

चहामध्ये काळी मिरी आणि वेलची पावडर टाका. काळी मिरीमध्ये पिपेरिन (झळशिळपश) नावाचा घटक असतो, जो पोषक तत्वांचे शोषण करण्यास मदत करतो, तसेच वेलची चहाचा ताजेपणा वाढवण्यास आणि पचनक्रिया सुधारण्यास मदत करते.

# स्त्रिया आहेत म्हणून जग सुंदर आहे

स्त्रियांच्या बाबतीत बरेच पुरूष वैतागून म्हणतात, 'त्या बायकांना डोके कमी असतं म्हणून व्यापाऱ्यांचं फावतं. काही असो, स्त्री आहे म्हणून पुरूष कष्ट करतो, स्त्री आहे म्हणून पैसा खर्च होतो, स्त्री आहे म्हणून पैसा खर्च होतो, स्त्री आहे म्हणून घरं उभी राहिली.

सगळेच पुरूष असते तर घरं, बंगले दिसलेच नसते. सगळे पुरूष उघड्या मैदानात चटया अंथरून उघडे झोपले असते. या जगात फुलांना किंमत स्त्रियांमुळे. मुलांच्या आया होण्यात स्त्रीला आनंद. तिच्यामुळे माया आहे. ती रागावते, प्रेम करते म्हणूनच तिच्या खर्चाबद्दल कोणी तक्रार करत नाही. स्त्री असूया बाळगते म्हणूनच घरात वस्तू येतात. नुसतेच सगळे पुरूष असते, तर रस्ताभर सिगारेटची थोटकं पडलेली दिसली असती. कथांमध्ये स्त्रिया असतात, त्यामुळे त्या वाचनीय होतात. स्त्रिया आहेत म्हणून तुम्ही आम्ही आहोत. या स्त्रियांचे अस्तित्त्व आणखी कशाकशात आहे ते पहा-स्त्री प्रेमात आइस्क्रीम बनते. पुरूष कोन असतो. राग आला की, स्त्री वणवा बनते. पुरूषाचं पाणी पाणी करते, स्त्री मधासारखी गोड असते. स्त्रीमुळे नशा आहे.



तिनं हसून पाहिलं की हृदयाची काच तडकते, स्त्रीशी मैत्री म्हणजे बागेतला विहार, सर्वत्र सुवास आणि पायाखाली हिरवळ, स्त्री गप्प असली की, पुरूषाला उदास वाटतं किंवा ती वादळापूर्वीची शांतता असू शकते. स्त्री छान समजूत घालते, स्त्री ही पुरूषांना देवानं दिलेली अलौकिक भेट आहे. ती सुखी तर देश सुखी.

ज्याची वाट पाहणारी स्त्री घरी आहे, तो भाग्यवान ! आई, बहीण व मुलीच्या रूपात स्त्री देवतेला जो पुरूष पुजतो, मानतो त्याला अन्न कमी पडत नाही व गृहदेवतेच्या मनाप्रमाणे जो वागतो त्याला सुख कमी पडत नाही, असे म्हणतात.

ज्याला मुलंबाळं आहेत, त्यानं रिकाम्या हाताने घरी जाऊ नये. ज्याची वाट पाहणारी पत्नी आहे त्याने उशीर करू नये. भांडणाचं कारण लगेच चिरडून टाकावं. हसरं घर स्वर्गासारखं असतं.

## छान छान गोष्टी...

### मी साहेब नाही

बंगाली साहित्यातील एक युगपुरुष मायकेल मधुसूदन दत्त हे एकदा पूर्व बंगालच्या पाटनगरीत एका शहरात गेले होते तेव्हा तेथील साहित्यप्रेमी युवकांनी त्यांना मानपत्र दिले. आता मानपत्रांची भाषा म्हणजे फुलोरा आलाच. त्या युवकांनी लिहिले होते, आपली विद्या, आपली बुद्धी, आपली प्रतिभा यांच्या तेजाने आम्ही साहित्यरसिक प्रफुल्लवदन झालो आहोत. फक्त एका गोष्टीचा विषाद वाटत होता. आम्ही ऐकले होते की, आपण इंग्रज झाला आहात. (कारण त्यांनी एका इंग्रज मॅडमेशी संसारही थाटला होता) पण आपल्या आचरणाने आणि आपल्या संभाषणाने आमची भीती अनाठायी असल्याचे सिद्ध झाले, हे नमूद करण्यास आनंद वाटतो. मधुसूदन कवींनी उत्तरादाखल म्हटले, माझ्यासंबंधी तुम्हा मंडळींचा इतर कोणताही गैरसमज समजण्यासारखा आहे. मात्र मी 'साहेब' झालो आहे, असं म्हणणं अन्यायाचं ठरेल. विधात्यानंच इंग्रज होण्याच्या माझ्या मार्गात खीळ घालून ठेवली आहे. माझ्या बैठकीच्या खोलीत नि निजायच्या खोलीत, अशा दोन्ही ठिकाणी मी मोठे आरसे टांगून ठेवले आहेत. साहेब होण्याची इच्छा मनात उद्भवलीच तर मी आरशात मुखडा पाहतो. तेवढी मात्रा लागू पडते. मी शंभर टक्के बंगाली आहे. इतकंच नव्हे तर मी 'बांगाल' (पूर्व बंगाल निवासी) आहे. जेसोर (यशोहर) चा! .

**तात्पर्य : माणूस किती मोठा झाला तरी आपले पूर्वीचे स्थान विसरत नाही.**

# सुगरणीचा सल्ला


❐ आपण चाकवताची भाजी करताना पुढील शेंडे व कोवळी देठे घेतो वा उरलेली टाकून देतो. ती न टाकता छोटे तुकडे करून वाळवून ठेवावीत व तुरीचे वरण शिजवताना डाळीत छोटे तुकडे टाकावेत. न शिजणारी डाळही लवकर शिजते व देठातील सत्व पण मिळते.

❐ टोमॅटोचे सार करताना त्यात कांदा, लसूण बरोबर चमचाभर मुगाची डाळही शिजवावी. सार दाट होते. त्याला मैदा किंवा कॉर्नफ्लोअर लावावे लागत नाही, मुख्य म्हणजे या साराचे आहारमूल्य वाढते.

❐ कोणत्याही प्रकारच्या जाड शेवया घ्याव्यात. नंतर ज्या उपलब्ध भाज्या असतील त्या घेऊन कांदा-टोमॅटो घालून सरसरीत रस्सा भाजी करावी व त्यात शेवया चांगल्या शिजू द्याव्यात. वरून कोथिंबीर घालावी. अगदी मोकळं केल्यास (कमी पाणी घालून) शेवयांचा उपमा तयार होईल. नाही तर ब्रेडबरोबर खाण्यास रस्सा भाजी तयार होईल. या 'वन-मील-डीश' मुळे मुलं ज्या भाज्या अजिबात खात नाहीत त्या त्यांच्या आहारात आपोआप येतात.

❐ टिक्की-बटाटेवडा-पॅटीस-कटलेट करताना बटाट्याचा मॅश वापरतो तेव्हा लगदा तयार करताना त्यात थोडं दूध, लोणी किंवा साय टाकावी. मॅशला छान वास येतो.

❐ बाजारातून आणलेले आले, सर्व काही वापरले जात नाही. ते वाळून जाते व कडक होते. अशा वेळी ते लहानग्या कुंडीत ओल्या मातीत खुपसून ठेवावे. आयत्या वेळी कुंडीतून काढून स्वच्छ धुऊन पदार्थात घालता येते.



❐ वांग्याचे काप करावयाचे असल्यास (भजी नव्हे), थोड्या पाण्यात चण्याच्या डाळीएवढा सोडा टाकून, त्यात वांग्याचे काप दहा मिनिटे ठेवावेत व नंतर पिठात घोळवून, तव्यावर तेल सोडून लावावेत. काप लवकर तयार होतात. तेलाची व इंधनाची बचत होते व काप चविष्ट लागतात.

❐ पीठ पेरून करावयाच्या भाजीबरोबर हरबरा डाळीचे पीठ प्रथम तेलावर चांगले भाजून घ्या. चार चमचे पिठासाठी दोन चमचे तेल, तूप पुरे. पीठ तुपामध्ये भिजलेले दिसले पाहिजे. भाजी धुऊन, चिरून व कुकरमध्ये शिजवून घ्या. फोडणीला कमी तेल लागेल. जिरे, मोहरी, बुडण्यापुरते अर्धा चमचा तेल पुरे. फोडणीमध्ये चिरलेला कांदा, लसूण घालून चांगले परता. नंतर शिजवलेली भाजी व भाजलेले पीठ, मीठ, मसाला, तिखट, हळद मिसळून परता. भाजी मोकळी होईल.

❐ ओल्याकांद्याची कोवळी पात कांद्याच्या गड्डीबरोबर येते. कांदे बाजूला काढून पात धुऊन स्वच्छ पुसून घ्यावी व बारीक चिरून तिला चवीप्रमाणे मीठ, तांबडे तिखट लावून वरून गोडेतेल थोडेसे टाकून त्यावर लिंबू पिळावे. ही पात तशीच हिरवी जेवणाबरोबर तोंडी लावण्यास फारच चवदार लागते. कांद्याच्या पातीप्रमाणे मेथीची भाजीही निवडल्यावर धुऊन झाल्यावर स्वच्छ फडक्याने कोरडी केल्यावर बारीक चिरून तिलाही तेल व तिखट, मीठ व वरून लिंबू पिळल्यावर या हिरव्या भाजीची चव काही आगळीच लागते.

❐ कोबी चिरायला थोडा त्रासदायक. आयत्या वेळी घाईगर्दीत कोबी चिरताना, बटाट्याच्या मोठ्या छिद्राच्या किसणीने किसल्यास एकसारखा चिरल्याप्रमाणे दिसतो. याच पध्दतीने जास्त प्रमाणात काकडी चोचायची असल्यास सुरेख किसता येते. फक्त किसणीची दिशा उलटी धरून काकडी किसावी म्हणजे चोचल्यासारखी दिसते.

❐ उकडलेल्या बटाट्याची भाजी करताना, बटाटे जास्त वाफेने फुटू नयेत म्हणून त्यात थोडेसे मीठ घालून ते उकडावेत. म्हणजे बटाटे फुटत नाहीत व चवीपुरतेच मीठ बटाट्यात उतरते. हीच कृती छोले, वाटाणे, डबल-बी इ. साठी केल्यास असेच फायदे होतात.

❐ लहान वांगी असल्यास भाजून भरीत करणे शक्य नसते. अशा वेळी वांग्यांना तेलाचा हात लावून ती उकडून घ्यावीत. गार झाल्यावर सोलावीत. भाजण्यानं परिणाम साधण्यासाठी एका लहान कोळशावर अर्धा चमचा तूप टाकून तो पेटवावा. पूर्ण पेटल्यावर फुंकरीने विझवावा. धूर निघू लागेल. लगेचच तो वांग्यांच्या गरात सोडावा. पाच मिनिटांनी काढावा. त्याचा सुरेख जळका वास येतो. याचप्रमाणे काही पंजाबी भाज्यांत व चिकन-मटण वगैरे मांसाहारी प्रकारांत असा कोळसा ५ ते १० मिनिटे बुडवून ठेवावा. सुरेख वास लागतो. पदार्थाची चवही वाढते.


**उपविभागीय अधिकारी दौंड तथा उपविभागीय दंडाधिकारी दौंड यांचे कार्यालय**

अर्ज क्र. जन्म/मृत्यु/एस.आर/५१५/२०२४
दिनांक २७/०४/२०२६

**जाहिर प्रसिध्दीकरण**

१) अर्जदार श्री.गुलजार हबिंब शेख
रा.दौंड – अर्जदार

विरुध्द

१) उपनिबंधक दौंड नगरपालिका/महानगर पालिका –सामनेवाला

विषय :- जन्म – मृत्यु नोंदणी ( दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२) (३) प्रमाणे अर्ज

ज्याअर्थी, यातील अर्जदार गुलजार हबिब शेख हे वर नमुद पत्यावरील कायम रहिवासी आहे. अर्जदार यांचा जन्म दिनांक ०९/०३/१९८१ रोजी गांव दौंड ता.दौंड,जि.पुणे येथील राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांची कार्यालयात जन्म/मृत्युचे रजिस्टरला नोंद नसलेमुळे त्यांनी जन्म – मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२) (३) प्रमाणे नोंद होवुन मिळणेबाबत या कार्यालयात दिनांक २३/१२/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी सदर अर्जाकामी अर्जदार जन्म दाखला मिळणेकामी कोणाची कांही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवासाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी दौंड तथा उपविभागीय दंडाधिकारी दौंड यांचे कार्यालयात स्वत: अथवा आपल्या वकिला मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. कोणाचाही कांही हरकत अथवा म्हणणे मुदतीत न आल्यास कोणाचाही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधित दाखला देण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दिनांक २७/०४/२०२६ रोजी आमचे सहीने व शिक्क्याने प्रसिध्द केले असे .

सही/-
(रेवणनाथ लबडे )
उपविभागीय अधिकारी दौंड तथा
उपविभागीय दंडाधिकारी दौंड

शिक्का

ठिकाण – दौंड
दिनांक २०/४/२०२६

# विकसित महाराष्ट्र-२०४७ साठी शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरणासाठी राज्याचे विशेष प्रयत्न : मुख्यमंत्री फडणवीस

जनप्रवास : प्रतिनिधी

नवी दिल्ली : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि सर्वसमावेशक मानवी विकास या पाच प्रमुख बाबींवर महाराष्ट्र शासन विशेष भर देत आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीसोबतच समतोल व सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व क्षेत्रात व्यापक प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाच्या नियामक मंडळाच्या अकराव्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाचा रोडमॅप सादर केला. या बैठकीस केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे उपराज्यपाल, नीती आयोगाचे उपाध्यक्ष अशोककुमार लाहिडी आणि सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एकूण सकल देशांतर्गत उत्पन्नात सुमारे १४ टक्के योगदान देणारे महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा विकसित होत असल्या तरी सुशिक्षित, कुशल, निरोगी आणि सक्षम नागरिक हीच महाराष्ट्राची खरी ताकद आहे. या पार्श्वभूमीवर विकसित महाराष्ट्र – २०४७ हे व्हिजन डॉक्युमेंट जाहीर करण्यात आले असून २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर, २०३५ पर्यंत दोन ट्रिलियन आणि २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्यातील सर्व विभागांनी २०२९–३० पर्यंतच्या कालावधीसाठी कृती आराखडे तयार केले असून शाश्वत विकास उद्दिष्टांची वेळेत पूर्तता करण्यावर राज्याचा भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.



आकांक्षित जिल्ह्यांची संख्या चारवरून दहापर्यंत आणि आकांक्षित तालुक्यांची संख्या २७ वरून १७७ पर्यंत वाढविण्यात आली असून या भागांच्या सर्वांगीण विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० ची सर्वसमावेशक अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, बहुविद्याशाखीय शिक्षण, मल्टिपल एन्ट्री–एक्झिट प्रणाली, कौशल्य आधारित अभ्यासक्रम, इंटर्नशिप तसेच एआय, रोबोटिक्स, डेटा सायन्स आणि ब्लॉकचेनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात समावेश करण्यात येत आहे. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात देशातील पहिली जागतिक दर्जाची एज्युसिटी विकसित करण्यात येत असून ती देश–विदेशातील विद्यार्थ्यांसाठी आकर्षण केंद्र ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पूर्व प्राथमिक शिक्षण मजबूत करण्यासाठी 'पोषण भी – पढाई भी', आरंभ, स्मार्ट अंगणवाडी आणि सक्षम अंगणवाडी यासारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. बालस्नेही शिक्षण वातावरण निर्माण करण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर आणि अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण सुरू आहे. शालेय शिक्षणात महाराष्ट्राची परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्समध्ये प्रचेस्टा–१ कडे वाटचाल सुरू आहे. राज्यात २ कोटी आठ लाखांपेक्षा अधिक 'अपार आयडी' तयार करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांची गळती शून्यावर आणणे, डिजिटल वर्ग, व्यावसायिक शिक्षण तसेच मुली, आदिवासी व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षण सुविधा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट राज्याने ठेवले आहे.

राष्ट्रीय प्रशिक्षणार्थी प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून राज्यात ३ लाख ३० हजारांहून अधिक प्रशिक्षणार्थी नोंदणीकृत आहेत. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नवसंशोधन धोरण २०२५ अंतर्गत पुढील पाच वर्षांत १ लाख २५ हजार उद्योजक घडविणे आणि ५० हजार स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एआय, डीप–टेक, फिनटेक आणि शाश्वतता या क्षेत्रांवर विशेष भर दिला जात असून 'महाराष्ट्र इनोव्हेशन सिटी' विकसित करण्यात येत आहे. तसेच कुशल युवकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी' ही संस्था स्थापन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आरोग्यसेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत उपचार पॅकेजेसची संख्या २३९९ पर्यंत वाढविण्यात आली आहे. राज्यात ४५३७ रुग्णालये या योजनांशी संलग्न करण्यात आली आहेत. शहरी भागांसाठी स्वतंत्र शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्यात आले असून ११ नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे काम सुरू आहे. मेडिसिटी संकल्पनेद्वारे वैद्यकीय शिक्षण, संशोधन, तृतीयक आरोग्यसेवा आणि आयुष प्रणाली यांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. महिला सक्षमीकरण हे आर्थिक विकासाचे प्रमुख साधन असल्याचे नमूद करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उमेद अभियानाअंतर्गत राज्यात ५० लाख लखपती दिदी झाल्या असून ही संख्या एक कोटीपर्यंत नेण्याचा मानस आहे. बचत गटांच्या उत्पादनांसाठी १३ जिल्हास्तरीय उमेद मॉल्स उभारण्यात येत आहेत.

लाडकी बहीण योजनेतर्गत सध्या १.६६ कोटी महिला लाभार्थी असून या योजनेमुळे महिलांचे आर्थिक स्वावलंबन, उद्योजकता आणि आरोग्य सुधारण्यास मदत झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी शिक्षण व कौशल्य विकासाच्या माध्यमातून संधी निर्माण करण्यावर राज्याचा भर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.



## 'कृषी मित्र' भरतीच्या नावाखालील बोगस जाहिरातींपासून सावध राहा : मंत्री दत्तात्रय भरणे

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यात 'कृषी मित्र' भरतीच्या नावाखाली सोशल मीडिया आणि इतर माध्यमांद्वारे काही व्यक्तींकडून बोगस जाहिराती प्रसारित करून शेतकरी, युवक व नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा कोणत्याही खोट्या जाहिरातींवर विश्वास ठेवू नये, तसेच कोणीही याला बळी पडून नये, असे आवाहन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही भरती प्रक्रियेची माहिती केवळ शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर, अधिकृत प्रसिद्धी माध्यमांद्वारे किंवा संबंधित कार्यालयांमार्फतच जाहीर केली जाते. त्यामुळे सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अप्रमाणित जाहिराती, अर्जासाठी शुल्क भरण्याच्या सूचना, वैयक्तिक बँक खात्यावर पैसे जमा करण्याचे आवाहन किंवा संशयास्पद लिंक यांना बळी पडू नये.

यासंदर्भात माहिती देताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, कृषी मित्र भरतीच्या नावाखाली शेतकरी, युवक आणि नागरिकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणतीही गय केली जाणार नाही. खोट्या व दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रसारित करून फसवणूक करणाऱ्या व्यक्ती अथवा संबंधितांवर कृषी विभागामार्फत फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. नागरिकांनी अशा बोगस जाहिरातींपासून सावध राहून भरतीसंदर्भातील माहितीची खातरजमा अधिकृत माध्यमांतूनच करावी. नागरिकांनी कोणत्याही संशयास्पद जाहिराती किंवा संदेश आढळल्यास तात्काळ संबंधित कृषी विभागाच्या कार्यालयास अथवा स्थानिक पोलीस प्रशासनास माहिती द्यावी, असेही आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

## लवकरच नवी मुंबईकरांसाठी नवीन धरण उपलब्ध : गणेश नाईक यांची ग्वाही

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : नवी मुंबईतील वाढती लोकसंख्या, पाऊस वेळेत न पडल्यामुळे मोरबे धरणातील पाण्याचा तुटवडा, रायगड जिल्ह्यात नवीन धरणाची निर्मिती, नवी मुंबईकरांना भविष्यात मिळणारे पाणी याबाबत सविस्तर माहिती देतांना नवी मुंबईतील नागरिकांची पाण्याची समस्या सोडविण्यासाठी लवकरच नवीन धरण उपलब्ध करून देण्यात येईल, अशी सुस्पष्ट ग्वाही ठाणे, पालघर चे पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिली. ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रांचा कराराचा कालावधी पाच वर्षावरून एक वर्षाचा केल्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांमध्ये असंतोष होता. ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकाऱ्यांना या करारासाठी कागद पत्राचा सतत पाठपुरावा करावा लागतो. ज्येष्ठ नागरिकांना करारासाठी होणारा त्रास दूर व्हावा म्हणून सानपाडा नागरिक संघाच्या

वतीने विरंगुळा केंद्रांचे करार कायमस्वरूपी करावे. त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेने ज्येष्ठ नागरिकांसाठी अर्थसंकल्पात आर्थिक निधीची तरतूद केली आहे. हा निधी विरंगुळा केंद्राना उपलब्ध करून केंद्रांच्या विकासासाठी वापरावा. अशी लेखी मागणी महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे करण्यात आली . सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव यांनी



विरंगुळा केंद्रांच्या कराराबाबत योग्य बाजू मांडल्यानंतर ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री व वनमंत्री गणेश नाईक यांनी विरंगुळा केंद्रांची करार पाच वर्षाचे करा, अशा प्रकारचे आदेश नवी मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिले. त्यामुळे आता लवकरच विरंगुळा केंद्रांच्या कराराचा कालावधी पाच वर्षाचा होणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आर्थिक अंदाजपत्रकात ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक निधीची तरतूद केल्याबद्दल सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने ११ जून २०२६ रोजी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात ग्रहात झालेल्या जनता दरबारप्रसंगी नवी मुंबईचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री, पालघर तसेच ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांचा संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव आणि माजी अध्यक्ष राम काजरोलकर यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी शिवसेनेचे (उबाठा पक्षाचे) उपशहर प्रमुख अजय पवार यांनी सानपाडा येथील पाणी टंचाई बाबत आणि पामबीच मार्गे येणारी पाण्याची ४०० मिमी पाईप लाईन रेल्वे कारशेड जवळी रेल्वे ट्रॅक खालून जोडून देण्यासाठी लेखी निवेदन मंत्री महोदयांना दिले. मंत्री महोदयांनी नवी मुंबईतील वाढती लोकसंख्या, पाऊस वेळेत न पडल्यामुळे मोरबे धरणातील पाण्याचा तुटवडा, रायगड जिल्ह्यात नवीन धरणाची निर्मिती, नवी मुंबईकरांना भविष्यात मिळणारे पाणी याबाबत सविस्तर माहिती दिली.

## राज्यातील आरोग्य यंत्रणेच्या बळकटीसाठी मंत्री प्रकाश आबिटकर यांची नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक

### कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेची वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत वाढविण्यास तत्त्वतः मान्यता

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नवी दिल्लीत राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या (एनएचएम) केंद्रीय अतिरिक्त सचिव व व्यवस्थापकीय संचालक आराधना पटनाईक (भाप्रसे.) यांची कर्तव्य भवनमध्ये भेट घेतली. २०२६–२७ च्या कार्यक्रम अंमलबजावणी आराखड्यांतर्गत (पीआयपी) निधी मंजुरी तसेच अतिरिक्त निधीच्या मागणीसाठी ही बैठक महत्त्वाची ठरली.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी लाभार्थी बालकांची वयोमर्यादा



दोन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढविण्यास या बैठकीत तत्त्वतः मान्यता देण्यात आली. या महत्वपूर्ण निर्णयामुळे राज्यातील अधिकाधिक मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

आरोग्य सेवा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आशा स्वयंसेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या दैनंदिन कामकाजातील विविध ऑनलाइन नोंदी, अहवाल सादरीकरण व आरोग्यविषयक माहितीचे डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी आशा स्वयंसेविकांना मोबाईल फोन उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. आशा स्वयंसेविकांचे प्रोत्साहनपर मानधन वेळेत वितरित करण्यासाठीही केंद्र शासनाकडून निधी वेळेवर मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जननी सुरक्षा योजना, कुटुंब नियोजन कार्यक्रम, क्षयरोग निर्मूलनासाठी निक्षय योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण वेळेत मिळण्यासाठी आवश्यक निधी त्वरित उपलब्ध करून देण्याची; तसेच महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने सादर केलेल्या नावीन्यपूर्ण आरोग्यविषयक प्रस्तावांना मंजूरी देण्याची मागणी करण्यात आली. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करण्यासाठी अनुदान वेळेवर उपलब्ध करून देणे, तसेच पायाभूत सुविधा कक्ष अंतर्गत प्रलंबित देयके तातडीने मंजूर करण्याबाबत यावेळी आग्रह धरण्यात आला. या बैठकीत महाराष्ट्रातील निदान सेवा अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर विचारविनिमय झाला . तसेच पीएम – एभीम अंतर्गत क्रिटिकल केअर व एकात्मिक सार्वजनिक प्रयोगशाळा साठीचा प्रस्ताव सादर करणेबाबत चर्चा झाली. महाराष्ट्रात सार्वजनिक आरोग्य विभागाकडून लोकाभिमुख योजना राबवण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामध्ये समन्वय वाढवण्यावर भर दिला जात आहे.

## १ ऑगस्टपासून महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड बंधनकारक : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरण मोहिमेला वेग आला असून आज अखेर राज्यातील सुमारे ५१ लाख नागरिकांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी



केली आहे. त्यापैकी सुमारे २५ लाख स्मार्ट कार्ड कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरित नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्डेही लवकरच सुरू करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांनी विलंब न करता आपली प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कार्ड वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी राज्यभरात ४ हजारांहून अधिक स्मार्ट कार्ड वितरण केंद्रे कार्यरत आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना सहजपणे कार्ड उपलब्ध व्हावे यासाठी ही केंद्रे सक्रियपणे सेवा देत आहेत. दरम्यान, स्मार्ट कार्डच्या वितरणामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार खपवून घेतला जाणार नसल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले आहे. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणाऱ्या वितरण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले आहे.

महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या विविध प्रवासी सवलतींचा लाभ सुरळीतपणे मिळावा, तिकीट वितरण प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि प्रवास व्यवस्थापन अधिक आधुनिक व्हावे, या उद्देशाने स्मार्ट कार्ड प्रणाली राबविण्यात येत आहे.

# कला विश्व

## जॉनी लिव्हर यांना विनोद सुचतात तरी कसे? अक्षय कुमारच्या प्रश्नावर 'कॉमेडी किंग'ने दिले भन्नाट उत्तर

बॉलीवूडचे कॉमेडी किंग जॉनी लिव्हर यांनी अनेक दशके प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन केले आहे. विनोदाचे अचूक टायमिंग, चेहऱ्यावरील भन्नाट हावभाव व अफलातून विनोदी शैली यांमुळे त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. प्रेक्षकांना कधी पोट धरून हसायला लावणारे, तर कधी विनोदातून वास्तव मांडणारे जॉनी लिव्हर यांनी हिंदीसह इतर भाषांमध्येही काम केले आहे. हुबेहूब कलाकारांची नक्कल करणे ही त्यांची खासियत आहे. जॉनी लिव्हर संघर्षमय परिस्थितीतून अभिनय आणि विनोदाच्या जोरावर बॉलीवूडमध्ये भक्कम स्थान निर्माण केले. आजही त्यांच्या विनोदाची जादू तितकीच कायम आहे. जॉनी



लिव्हर यांना कॉमेडी कशी सुचते आणि कोणामुळे सुचते याबद्दल त्यांनी भन्नाट उत्तर दिले आहे. अभिनेते जॉनी लिव्हर हे 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटामध्ये झळकणार आहेत. 'वेलकम' फ्रँचायजीच्या या तिसऱ्या भागात जॉनी लिव्हर पुन्हा एकदा आपल्या खास विनोदी अंदाजात प्रेक्षकांना खळखळून हसवताना दिसणार आहेत. 'वेलकम टू द जंगल' चित्रपटाचा भव्य असा ट्रेलर लाँच इव्हेंट पार पडला आहे. या चित्रपटामध्ये तगडी स्टारकास्ट असून, बहुतांश लोकप्रिय कलाकार झळकणार आहेत. ट्रेलर लाँच इव्हेंटदरम्यान, जॉनी लिव्हर यांना कॉमेडी सुचते कशी याबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर आपल्या खास विनोदी शैलीमध्ये उत्तर देत जॉनी लिव्हर यांनी बायकोचे नाव घेतले. त्यांच्या उत्तरामुळे सर्व जण जोरजोरात हसू लागले. ट्रेलर लाँच कार्यक्रमात अभिनेता अक्षय कुमार याने यावेळी कॉमेडी किंग जॉनी लिव्हर यांनाच थेट प्रश्न विचारला. साधारणपणे स्टेजवर उपस्थित कलाकारांना माध्यमांकडून प्रश्न विचारले जातात; पण आज मला जॉनीभाईंना एक प्रश्न विचारायचा आहे, असे म्हणत अक्षयने प्रश्न विचारले. जॉनी लिव्हर यांना तो म्हणाला की, आम्ही तुम्हाला एवढी वर्षे झालं कॉमेडी करताना पाहत आहोत. तुमची कॉमेडीची एक खास स्टाईल आहे आणि ती स्टाईल एवढी वर्षं तुम्ही कशी काय सुरू ठेवली आहे आणि ही कॉमेडी तुम्हाला कशी काय सुचते? हे लहानपणापासून तुम्हाला येत होते का? असे विनोद तुम्हाला कसे काय सुचतात? हे एका लहान कॉमेडियनला उत्कृष्ट कॉमेडियनकडून जाणून घ्यायचे आहे, असे म्हणत अक्षय कुमारने कुतूहलाने प्रश्न विचारले. मात्र, त्यावर जॉनी लिव्हर यांनी अतिशय गमतीशीर उत्तर दिले. या प्रश्नांवर जॉनी लिव्हर यांनी, कॉमेडी मी माझ्या बायकोकडून शिकतो, मी शूटिंगवरून परत येतो तेव्हा मला वेडेवाकडे तोंड करून बायको विचारते की, असे करून आले का? असे मजेशीर उत्तर कॉमेडी किंग जॉनी लिव्हर यांनी दिले.

## ५८ व्या वर्षी अक्षय कुमार बॉलीवूडमधून निवृत्त होणार? म्हणाला, रोज पहाटे ४ वाजता मनात दररोज निवृत्तीचा विचार येतात

अभिनेता अक्षय कुमार हा मागील तीन दशकांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत असून त्याचा मोठा चाहतावर्ग आहे. अक्षय कुमारने अ‍ॅक्शन आणि कॉमेडी चित्रपटातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. ५८ वर्षांचा अक्षय वर्षभरात अनेक चित्रपट करतो. तो हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक कमाई करणाऱ्या अभिनेत्यांपैकी एक मानला जातो. नेहमीच सकारात्मक आणि उत्साही दिसणाऱ्या अक्षय कुमारने आता त्याच्या निवृत्तीबाबत वक्तव्य केल्याने चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च कार्यक्रमादरम्यान त्याने मनात दररोज निवृत्तीचा विचार येत असल्याचे सांगितले आहे. अक्षय कुमारने आतापर्यंत १५० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. ॲक्शन, कॉमेडी, रोमान्स आणि सामाजिक आशय असलेल्या चित्रपटांमध्ये लक्षवेधी भूमिका साकारल्या आहेत. लवकरच त्याचा 'वेलकम' चित्रपटाचा सिक्वेल 'वेलकम टू द जंगल' प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च कार्यक्रमावेळी अक्षय कुमारने निवृत्तीबाबत वक्तव्य केले आहे. अक्षय कुमार म्हणाला, अधूनमधून मनामध्ये निवृत्तीचा विचार येतो, पण तो फार वेळ टिकत नाही. रोज पहाटे ४ वाजता उठल्यावर निवृत्ती घ्यावी असा विचार येऊन जातो. पण पुढच्या पाच सेकंदांतच मला आठवतं की शूटिंगला जायचं आहे. सेटवर ३०० लोक वाट पाहत आहेत. मग तो विचार तिथेच



सोडून देतो आणि उद्या निवृत्त होऊ, असे स्वतःला समजावतो. पण पुन्हा दुसऱ्या दिवशी पहाटे उठल्यावर हेच विचारांचं चक्र सुरू होतं. गेली ३६ वर्षे हे असंच सुरू आहे. पुढे अक्षय कुमारने त्याला निवृत्ती का आवडत नाही, याबाबतही मिश्किलपणे उत्तर दिले. अक्षय म्हणाला, मी निवृत्त झालो तर काय होईल? घरी बसून मला इलेक्ट्रिशियनचं काम करावं लागेल. कुत्र्यांना फिरवण्याची जबाबदारी माझ्यावर येईल. बागेची साफसफाई करावी लागेल, घरातील सगळी कामं मला करावी लागतील. त्यामुळे घरी बसण्यापेक्षा कामावर जाणंच जास्त चांगलं आहे. म्हणून मी निवृत्त होणार नाही, तेच माझ्यासाठी योग्य आहे. अक्षय कुमार कुटुंबाला वेळ देण्याबाबत म्हणाला की, अनेकदा असा प्रयत्न केला होता पण तो काही यशस्वी ठरला नाही. एकदा कामातून थोडा ब्रेक घेत घरी थांबायचे ठरवलं होते. सुट्टी घेऊन एक दिवसही पूर्ण झाला नाही, तर घरच्यांनी कामाला कधी परत जाणार असं विचारण्यास सुरुवात केली. तेव्हाच माझ्या हे लक्षात आलं की माझ्यासाठी कामावर राहणंच जास्त योग्य आहे. सिनेविश्वातील निवृत्तीबाबत मत व्यक्त करताना अक्षय कुमार म्हणाला की, खरं सांगायचं तर निवृत्ती हा शब्दच मला चुकीचा वाटतो.

* मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे * संपादक –सिद्धार्थ संजय भोकरे * सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०–२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com